बुधवार, २३ फेब्रुवारी २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २१७
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

### लोकल प्रवासासाठी लससक्तीचा निर्णय घेतला जाणार मागे?



**मुंबई** : कोरोना संकटामुळे लोकलमधून प्रवास करण्यासाठी करण्यात आलेली लससक्ती मागे घेतली जाऊ शकते. राज्य सरकारने उच्च न्यायालयात तशी तयारी दर्शवली आहे. याबाबतची पुढील सुनावणी २८ फेब्रुवारीला होणार आहे. लोकल प्रवासासाठी लससक्ती करण्याचा तत्कालीन मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी काढलेला आदेश कायद्यानुसार नसल्याचे कागदोपत्री दिसून येते. त्यामुळे हा आदेश मागे घेऊन सर्वांनाच लोकल प्रवासाची मुभा देणार की नाही हे मंगळवारी दुपारपर्यंत स्पष्ट करण्याचे आदेश हायकोर्टाने राज्य सरकारला दिले होते. लोकल प्रवासासाठी लससक्तीचा निर्णय मागे घेण्याची तयारी दर्शवताना त्याचवेळी या संदर्भातील आदेशाचा फेरविचार केला जाईल, असे सरकारने सांगितले आहे. त्यावर हायकोर्टाने यासंबंधी निर्णय घेण्यास सरकारला वेळ दिली असून पुढील सुनावणी २८ फेब्रुवारीला होणार आहे.

**अंतरंग**
- ‘महाविकास आघाडी सरकार शेतकरीविरोधी’/२
- ताकई रस्त्यासाठी खोपोलीतील सर्वपक्षीय नेते आक्रमक/५
- क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबई वॉरिअर्स संघ विजेता/६

# रायगडातील शिवसेना आमदारांचे उघड बंड

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाकडे पाठ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २२) ऑनलाइन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या दोघांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाकडे जिल्ह्यातील शिवसेनेच्या तीनही आमदारांनी पाठ फिरवली. शिवसेनेचा कोणताही स्थानिक नेतादेखील या कार्यक्रमाकडे फिरकला नाही.



(छाया : जितू शिगवण)

महाडचे आमदार भरत गोगावले, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे हे जिल्ह्यात शिवसेनेचे तीन विद्यमान आमदार आहेत. काही दिवसांपासून जिल्ह्यात शिवसेनेने पालकमंत्री हटाव भूमिका घेतली आहे. त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस संघर्ष सुरू आहे.

अलिबाग तालुक्यातील उसर येथे रायगड जिल्हा वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय बांधण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन मंगळवारी करण्यात आले. या भूमिपूजन कार्यक्रम पत्रिकेत जिल्ह्यातील सर्वच आमदारांची नावे होती, मात्र शिवसेनेच्या तीनही आमदारांनी कार्यक्रमास गैरहजर राहून रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे आणि खासदार सुनील तटकरे यांच्यावरील आपली नाराजी पुन्हा व्यक्त केली. शिवसेनेचे पदाधिकारीदेखील या कार्यक्रमास उपस्थित नव्हते. शिवसेनाचा फलक व एकही झेंडा या कार्यक्रमाच्या ठिकाणी नव्हता. त्यामुळे या कार्यक्रमावर शिवसेनेच्या आमदारांनी टाकलेला बहिष्कार हा चर्चेचा विषय ठरला आहे.

रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे आणि खासदार सुनील तटकरे यांच्यावर रायगडातील काँग्रेसचे नेतेदेखील नाराज आहेत. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी, सर्वांना सोबत घेऊन काम करा, असा सल्ला तटकरेंना या वेळी दिला.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार ऑनलाइन उपस्थित होते, तर वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख, आरोग्यमंत्री राजेश टोपे, पालकमंत्री आदिती तटकरे, जि. प. अध्यक्ष योगिता पारधी, खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष व माजी आमदार सुरेश लाड, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, जि. प. उपाध्यक्ष सुधाकर घारे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता महेंद्र कुरा, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, आरसीएफचे श्रीनिवास कुलकर्णी आदी प्रत्यक्ष उपस्थित होते.

## ओबीसी आरक्षणाचा २५ फेब्रुवारीला फैसला

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून बराच खल सुरू असताना आता थेट सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाचा फैसला होणार आहे. येत्या २५ फेब्रुवारी रोजी ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार असून त्यावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे भवितव्य अवलंबून असेल.

ओबीसी आरक्षणाशिवाय राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेण्याची भूमिका भाजपसह सर्व पक्षांनी घेतली होती. त्यामुळे २५ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल मान्य केला, तर राज्यात ओबीसी आरक्षणाचा

**अहवाल कोर्टात सादर**



मार्ग मोकळा होईल.

सर्वोच्च न्यायालयात याआधी झालेल्या सुनावणीनुसार राज्य मागासवर्ग आयोगाला इम्पिरिकल डेटा गोळा करण्याचे तसेच आपला अंतरिम अहवाल सादर करावा, असे निर्देश न्यायालयाने दिले होते. यानुसार राज्य मागासवर्ग आयोगाने तयार केलेला अंतरिम अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला असून त्यावर येत्या २५ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे.

## उलवे नोडमध्ये हळदीकुंकू समारंभास उत्स्फूर्त प्रतिसाद





(अधिक छायचित्रे पान ६ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका भारतीय जनता पक्ष आणि उलवे नोड २ महिला मोर्चा कमिटीतर्फे आयोजित हळदीकुंकू समारंभ सोमवारी (दि. २१) उत्साहात झाला. या समारंभाचे उद्घाटन भाजप नेत्या शकुंतला ठाकूर यांच्या हस्ते झाले, तर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्यासह अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससमोर झालेल्या हळदीकुंकू समारंभास भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, नगरसेविका सुशीला घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, माजी सरपंच हौसाबाई कोळी, न्हावा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच मंजुषा ठाकूर, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर, लीना पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य गिरीजाबाई कातकरी, उलवे नोड २ अध्यक्ष योगिता भगत, उपाध्यक्ष सुजाता पाटील, कामिनी कोळी, मिना म्हात्रे, चिटणीस उषा देशमुख, रंजना पाटील, सुमन पाटील, शुभांगी पाटील, सीना वर्गिस, अर्चना मिश्रा, अनसूया घरत, नंदा ठाकूर, जयश्री देशमुख, अनिता ठाकूर, यमुनाबाई पाटील, इंद्रायणी कोळी, शोभा ठाकूर, कमलाबाई म्हात्रे, संगीता कोळी, संगीता म्हात्रे, धनवंती पाटील, इंदूमती म्हात्रे, आशा म्हात्रे, स्नेहलता ठाकूर, देवकीबाई ठाकूर, मनीषा घरत, शांताबाई ठाकूर, बानूबाई भगत, जयश्री कोळी, राधाबाई ठाकूर, सीमा भगत, राधा ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या वेळी महिलांसाठी खेळ पैठणीचा, लकी ड्रॉ तसेच विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### निवडक

#### हिमाचलमध्ये कारखान्यात स्फोट; सहा महिलांचा मृत्यू


**ऊना** : हिमाचल प्रदेशातील ऊना येथे एका कारखान्यामध्ये स्फोट होऊन सहा महिलांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन वर्षांच्या मुलीचाही समावेश असून कामगार असणाऱ्या आपल्या आईसोबत ती कारखान्यात आली होती, तर १० महिला जखमी झाल्या असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

#### परमबीर सिंग यांना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

**मुंबई** : माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांची चौकशी येत्या ९ मार्चपर्यंत थांबवण्याचे निर्देश न्यायालयाने दिलेत तसेच त्यांच्याशी संबंधित प्रकरणांचा तपास सीबीआयकडे द्यायचा किंवा नाही याविषयी निर्णय घेतला जाणार आहे.

## आता मोबाइलवरूनही भरता येणार पनवेल महापालिकेचा मालमत्ता कर

### पीएमसी टॅक्स ॲपचे उद्घाटन



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका करदात्यांना आता घर बसल्या आपल्या महापालिका करांचा भरणा करता येणार आहे. त्याचप्रमाणे नावातील फेरफार किंवा तक्रारीबाबत आक्षेप, मालमत्ता उतारा व थकबाकीदार नसल्याचा दाखला महापालिका कार्यालयात न जाता मोबाइलवरून भरता येणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या नवीन ॲपचे उद्घाटन महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २२) करण्यात आले. १ एप्रिलपासून महापालिकेचा कर विभाग पेपरलेस होणार आहे.

महापालिका आपल्या दारी या उपक्रमामध्ये ई–गव्हर्नन्सच्या दृष्टीने पनवेल महापालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलून मंगळवारी पीएमसी टॅक्स ॲपचे उद्घाटन महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. सोबत उपायुक्त विठ्ठल डाके, गणेश शेट्ये, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, मालमत्ता कर विभागाचे प्रमुख सुनील मानकामे उपस्थित होते.

या वेळी आयुक्त गणेश देशमुख म्हणाले की, सगळ्यात कमी कर असलेली आपली महापालिका आहे. पाच वर्षांत आपण कर ठरवला नाही तर महापालिकेचा कारभार कसा चालेल. विकासकामे होणार नाहीत. खरेतर पहिल्या दोन वर्षांतच कर लावणे गरजेचे होते. प्रत्येकाला कर हा भरावाच लागेल. या ॲपमुळे जास्तीत जास्त नागरिक कर भरतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या वेळी मालमत्ता कर विभागातील कर्मचाऱ्यांना टॅब व प्रिंटरचे वाटप आयुक्तांच्या हस्ते करण्यात आले. (पान २ वर..)

> “ आयुक्त गणेश देशमुख यांनी आल्यावर कर आकारणी सुरू केली. इतर महापालिकांशी तुलना केल्यास ती कमी आहे. पनवेल महापालिकेचे पहिले आयुक्त सुधाकर शिंदे यांनी महापालिका स्थापन झाल्यावर त्यांच्या कालावधीत मालमत्ता कराची आकारणी केली नाही. त्यामुळे नागरिकांना पाच वर्षांची एकदम रक्कम भरावी लागत आहे. ती मोठी आहे. कोरोनामुळे अनेकांची नोकरी गेली किंवा पगार कमी झाले. त्यामुळे त्यांना ही रक्कम भरणे अवघड वाटते हे खरे आहे, पण या सगळ्याला पहिले आयुक्त सुधाकर शिंदेच जबाबदार आहेत.
>
> –**डॉ. कविता चौतमोल**, महापौर

> “ पनवेल महापालिकेत वर्षाला २१० कोटी रुपये कर जमा होणे अपेक्षित आहे. आजपर्यंत कोणतीही सक्ती न करता ८० कोटी रुपये कर जमा झाला आहे. ३१ मार्चपर्यंत आणखी ५० कोटी रुपये कर जमा होण्याची अपेक्षा आहे. १ एप्रिलपासून मात्र दंड आकारण्यात येऊन जप्तीची कारवाई सुरू करणार असल्याने जास्तीत जास्त मालमताधारकांनी कर भरावा.
>
> –**गणेश देशमुख**, आयुक्त



**पनवेल : महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९मध्ये काही ठिकाणी गटारांत पाणी साचण्याची समस्या नागरिकांना भेडसावत होती. त्या पार्श्वभूमीवर मनपा सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. याशिवाय त्यांनी दांडेकर हॉस्पिटलसमोर उभारण्यात येत असलेल्या शाळेच्या कामाचाही आढावा घेतला. (वृत्त पान २ वर..)**

## पनवेलमध्ये उद्या ‘मेरी आवाज ही पहचान है’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गानसम्राज्ञी भारतरत्न स्व. लता मंगेशकर यांच्या सुरेल आणि सोनेरी आठवणींना उजाळा देण्यासाठी पनवेलमध्ये गुरुवारी (दि. २४) रात्री ८ वाजता शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ’मेरी आवाज ही पहचान है’ या सुमधूर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



**स्व. लतादिदींच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सुमधूर गीतांचा विशेष कार्यक्रम**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा, भारत विकास परिषद, रंगनिल संस्था, रंगरचना कलामंच, संस्कार भारती पनवेल समिती आणि पनवेल कल्चरल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सामगंध कला केंद्र पनवेल हे सादरकर्ते आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी मोफत प्रवेशिका अमोल स्टेशनरी, टिळक रोड, पनवेल (संपर्क क्रमांक ९८२०२३३३४९) येथे उपलब्ध आहेत.



# मविआ सरकार शेतकरीविरोधी

## ■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची टीका

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यातील महाविकास आघाडी सरकार पूर्णपणे शेतकरीविरोधी आहे, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी (दि. २२) कोल्हापूर येथे पत्रकारांशी बोलताना केली.

दिशा सालियानच्या मृत्यूचे राजकारण होत असल्याचा आरोप एका पत्रकाराने निदर्शनाला आणला असता ते म्हणाले की, याबाबतीत काहीही राजकारण होत नाही. ७ मार्चनंतर सगळे पुरावे बाहेर येतील. दूध का दूध-पानी का पानी होईल. यात कोण गुंतले आहे आणि कोणाला तुरुंगात जावे लागेल हे स्पष्ट होईल. सध्या त्यामुळेच उसने अवसान आणून शिवराळ भाषा वापरणे चालू आहे. दिवा विझण्यापूर्वी फडफडतो तसा हा प्रकार आहे.

चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, महाविकास आघाडी पूर्णपणे शेतकरीविरोधी आहे. उसाचे एफआरपीचे पैसे दोन तुकड्यात देण्याचा या सरकारचा निर्णय ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान करणारा आहे. यामुळे शेतकरी ऊसशेती सोडून देतील असा धोका आहे. भारतीय जनता पक्ष या निर्णयाविरोधात टोकाचा संघर्ष करेल.

माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर शिवसेना नेते व मंत्री आदित्य ठाकरे यांनी केलेल्या टीकेबाबत प्रतिक्रिया विचारली असता चंद्रकांत पाटील म्हणाले की, २०१४ साली भारतीय जनता पक्षाने सरकार स्थापन केले. आम्ही हे सरकार आमच्या बळावर पाच वर्षे चालविले असते, पण शिवसेनेला सत्तेबाहेर राहणे अशक्य झाले. काहीही करून सत्तेत घ्यावे यासाठी ते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करीत होते हे आदित्य ठाकरे यांनी विसरू नये.

मविआ सरकारने राजकारणासाठी सत्तेचा व पोलिसांचा दुरुपयोग चालविला आहे, असा आरोपही त्यांनी केला.



**महाविकास आघाडी सरकारचे नेते रांगेत आहेत. काही जात्यात गेले तर काही सुपात आहेत. कोठड्या तयार आहेत. उत्तर प्रदेशात ७ मार्च रोजी शेवटचे मतदान झाले की, बहुधा कारवाई सुरू होईल. त्यातून पळता भुई थोडी होईल व हे सरकार पडेल, असे आपले विश्लेषण आहे. असा अंदाज सामान्य माणूसही बांधू शकतो.**
**-चंद्रकांत पाटील, प्रदेशाध्यक्ष, भाजप**

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खाडे-चव्हाण यांना पुरस्कार



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खाडे-चव्हाण सर्वोत्कृष्ट शाळा प्रमुख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या यशाबद्दल 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुख्याध्यापिका अर्चना यांचे अभिनंदन करून सत्कार केला. या वेळी रायगड विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर, पीआरओ बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते.

शिक्षणाच्या विस्तारासाठी मिश्रित शिक्षणाने संधी उपलब्ध करून दिली आहे. ही विद्यार्थी केंद्रित पद्धत अलीकडच्या काळात खूप यशस्वी ठरली आहे. सर्वोदय स्कूल कॉम्प्लेक्सने सिंघानिया क्रेस्ट प्लसच्या संयुक्त विद्यमाने, मिश्रित शिक्षणावर अधिक प्रकाश टाकण्यासाठी एका खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते जे कोरुना संकटाच्या काळात सामान्य झाले. या कार्यक्रमासाठी विविध शाळांमधील ७०हून अधिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना खाडे-चव्हाण यांनी सहभाग घेतला.

या चर्चासत्राच्या शेवटी सात जूरी सदस्यांनी उत्कृष्ट शाळा प्रमुखपुरस्कार नामंकानांचे मूल्यमापन केले. नामांकनांमध्ये मुख्याध्यापिका अर्चना खाडे चव्हाण यांना शैक्षणिक क्षेत्रातील प्रशंसनीय योगदानाबद्दल सर्वोत्कृष्ट सर्वांगीण शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा प्रमुख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# पनवेलमधील समस्यांची सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९मध्ये काही ठिकाणच्या गटारांमध्ये पाणी साचण्याची समस्या नागरिकांना भेडसावत होती. त्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या समस्यांची मंगळवारी (दि. २२) पाहणी करून अधिकाऱ्यांना आश्वयक त्या सूचना दिल्या तसेच दांडेकर हॉस्पिटलसमोर उभारण्यात येत असलेल्या शाळेच्या कामाची पाहणी करून आढावा घेतला.

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून नागरिकांना भेडसवणाऱ्या समस्या जाणून त्या सोडवण्याचे काम केले जात आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक १९ मधील एसटी स्टँड, उरण नाका, मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील गटारे तुंबण्याची समस्या नागरिकांना भेडसावत होती. त्या पार्श्वभूमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या गटारांची पाहणी करुन अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या तसेच दांडेकर हॉस्पिटलसमोर महापालिकेमार्फत कन्या शाळा, सरस्वती विद्यामंदिर, दगडी शाळा या एकत्रितपणे उभारण्यात येत आहे. या शाळेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या कामाचीही त्यांनी पाहणी केली.

या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका रूचिता लोंढे, भाजप नेते अ‍ॅड. जितेंद्र वाघमारे, शहर अभियंता संदीप कटेकर, श्री. साळुंखे, आरोग्य विभागाचे संजय जाधव, यतिन देशमुख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुखवटा
### गणेश पाटील



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी नगरसेविका नीता माळी यांचे बंधू गणेश कृष्णा पाटील यांचे रविवारी (दि. २०) निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, चार बहिणी, दोन मुले, चार आत्या असा परिवार आहे. कै. गणेश पाटील यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि. १ मार्च) उद्धर (पाली) येथे होणार आहे, तर उत्तरकार्य (तेरावे) शुक्रवारी (दि. ४ मार्च) तारा येथे घरी होणार आहे. कोणत्याही प्रकारचे दुखवटे आणू नये, असे आवाहन शोकाकूल पाटील परिवाराकडून करण्यात आले आहे.



**खारघर : सेक्टर ३५ ई मधील स्टेटस विहार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीशेजारी असलेया मोकळ्या भूखंडावर कचरा टाकत असल्याने मोठ्या प्रमाणात डेब्रिज जमा झाले होते. याची दखल भाजपचे खारघर तळोजा मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष विनोद घरत यांनी घेऊन स्वखर्चाने हा भूखंड जेसीबीच्या सहाय्याने साफ करून घेतला. या वेळी रामानंद, प्रताप सिंग राजपूत, राहुल अग्रवाल, कार्तिक गोपाल, रमेश शेट्टी, परेश शिंदे उपस्थित होते.**




**उलवे नोड : भाजप जासई युवा मोर्चा अध्यक्षपदी भूषण म्हात्रे याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने भूषण म्हात्रे याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते सुरेश पाटील, सुनील घरत, शिरीष म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**


## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणत्या कंपनीचा सेन्सेक्स ३० कंपन्यांत समावेश होत नाही?**
***अ.)*** सनफार्मा ***ब.)*** बजाज फायनान्स ***क.)*** एनटीपीसी ***ड.)*** बजाज ऑटो

**२. देशभर सेवा देणाऱ्या किती विमान कंपन्या सध्या भारतात आहेत?**
***अ.)*** १० ***ब.)*** ५ ***क.)*** ७ ***ड.)*** ३

**३. भारतातील सिमेंट क्षेत्रातील सर्वांत मोठी कंपनी कोणती?**
***अ.)*** अल्ट्राटेक सिमेंट ***ब.)*** अंबुजा सिमेंट ***क.)*** एसीसी ***ड.)*** श्री सिमेंट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**


# मुरूडमध्ये बालविवाह रोखला

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील भोईघर येथील टेंभोर्डे आदिवासीवाडीत सोमवारी (दि. २१) बालविवाह होत असल्याची खबर जिल्हाधिकाऱ्यांना लागल्याने त्यांच्या आदेशानुसार टेंभोर्डे आदिवासीवाडीत सुरू असलेला बालविवाह थांबविण्यात आला.

टेंभोर्डे आदिवासीवाडीवर बालिका वधू राणी वाघमारे (वय १५, रा. टेंभोडे) व वर शांताराम लक्ष्मण जाधव (वय १७, रा. साळाव आदिवासीवाडी संजय नगर) यांचा बालविवाह होणार असल्याची खात्री पटली.

या वेळी प्रशासकीय अधिकारी व पोलिसांनी कुटूंबीयांचे प्रबोधन करून बालविवाह रोखला. या वेळी दोन्ही कुटुंबीयांकडून बालविवाह करणार नसल्याची लेखी हमी घेण्यात आली आहे.



**कामोठे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भाजप शहर मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्या वतीने व एसएनआय हॉस्पिटल यांच्या सौजन्याने मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यासोबतच भाजप पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.**

पान १ वरून

## आता मोबाइलवरूनही भरता येणार पनवेल महापालिकेचा मालमत्ता कर

पनवेल महापालिका हद्दीतील नागरिकांना आपल्या मालमत्तेच्या कर आकारणी व त्या संबंधी कागदपत्रांसाठी महापालिकेत फेऱ्या मारायला लागू नयेत व त्यांचा वेळ वाचवा यासाठी महापौर डॉ. कविता चौतमोल व आयुक्त गणेश देशमुख यांच्या पुढाकाराने हे अ‍ॅप बनविण्यात आले आहे. स्थापत्य या कंपनीने ते तयार केले आहे. गुगल अ‍ॅप स्टोअरमधून ते मालमत्ताधारकांना आपल्या मोबाइलमध्ये घेता येणार आहे. या अ‍ॅपमधून महापालिका स्थापन झाल्यापासूनच्या कराच्या पावत्या डाऊनलोडही करता येणार आहेत. त्यामुळे मालमत्ताधारकांना आपल्या करासंबंधी सगळ्या बाबी घरी बसून उपलब्ध होणार आहेत.

या अ‍ॅपच्या माध्यमातून मालमत्ताधारकांना एसएमएसद्वारे मालमत्ता कराची बिले तसेच अंतिम तारखेचे नोटिफिकेशनदेखील येणार आहे. हे अ‍ॅप मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेत उपलब्ध करून देण्यात आले आहे. पीएमसी टॅक्स अ‍ॅप डाऊनलोड करताना सुरुवातीस साइन अप करावे लागेल, ज्यामध्ये मालमत्ताधारकाचा मोबाइल नंबर व एक पासवर्ड देण्यात येईल. तो प्रत्येक वेळी त्यास साईन इन करताना द्यावा लागेल. पुढे अ‍ॅपमध्ये मालमत्ताधारकांना त्यांचा मालमत्ता कर दिसेल तसेच नागरिकांची मालमत्ता, त्यांची पेमेंट पासबूक, नोंदणीकृत मालमत्ता कळू शकणार आहे. अ‍ॅपमध्ये पुढे ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरण्यासाठी क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, यूपीआय, भीम यूपीआय, क्युआर कोड असे विविध पर्याय दिसू शकतील. त्याचप्रमाणे ज्यांना ई-बिल हवे आहे त्यांना ही सेवा देण्याची सोयही या अ‍ॅपमध्ये करण्यात आली आहे.

## 'एसएनडीटी'चा दीक्षांत समारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठाचा ७१ वा वार्षिक दीक्षांत समारंभ शुक्रवारी (दि. २५) सकाळी ११ वाजता विद्यापीठातील सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृह (पाटकर हॉल) येथे आयोजित करण्यात आला आहे.

समारंभामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यापीठाचे विविध अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींना पदवी आणि पदविका प्रदान करण्यात येतील. समारंभाचे अध्यक्षस्थान राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी भूषवणार आहेत, तर प्रमुख अतिथी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत उपस्थित राहणार आहेत.

समारंभाच्या संचलन सरावासाठी निर्धारित वेशभूषेत शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता विद्यापीठाच्या चर्चगेट स्थित प्रांगणात उपस्थित राहावे. समारंभाच्या थेट वेबकास्टची लिंक विद्यापीठाच्या www.stndt.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

## पाणीपुरवठ्याबाबत सिडकोचे आवाहन

**नवी मुंबई :** सिडकोच्या हेटवणे पाणीपुरवठा योजनेंतर्गत असलेल्या वाहिनीवर महावितरण जिते येथील उपकेंद्राच्या दुरुस्तीच्या कामांमुळे बंद करणार असल्याने हेटवणे जल शुद्धीकरण केंद्र बंद राहणार आहे. यामुळे द्रोणागिरी, उलवे, खारघर नोडसह हेटवणे जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांचा पाणीपुरवठा शुक्रवार (दि. २५) सकाळी १० ते शनिवार (दि. २६) सकाळी १० वाजेपर्यंत बंद राहणार आहे.

**ग्रुप ग्रामपंचायत वडघर** ता. पनवेल, जि. रायगड

जावक क्रमांक - ५७/ग्रा.पं. वडघर/२०२२ दिनांक- २२/०२/२०२२

**जाहीर निविदा**

सर्व नोंदणीकृत ठेकेदार यांस कळविण्यांत येते की, खालीलप्रमाणे कामासाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी नोंदणीकृत ठेकेदारांनी दिनांक- २३/०२/२०२२ ते ०३/०३/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा - ०४/०३/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता उघडणेत येतील त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | सन | १% इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत व वेळ | निविदा फॉर्म स्वीकारण्याची अंतिम तारीख व वेळ | शेरा (निविदा फॉर्म फी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | वडघर मोहल्ला टेपावरील रुम बांधणे. | २९०००० | १५ वा वित्त आयोग | २०२०-२०२१ | २९०० | २३/०२/२०२२ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत ते ०२/०३/२०२२ | ०३/०३/२०२२ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत | १०० रुपये |
| ०२. | वडघर मोहल्ला रमीज खान ते खाडीपर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १८४७१८ | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | १८४७ | | | |
| ०३. | वडघर मोहल्ला धुमाल अली शौचालयकरिता संरक्षण भिंत गेट व जाळी बसविणे. | ९०००० | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | ९०० | | | |
| ०४. | वडघर बौद्धीवाडी समाजमंदिर ते नरेश म्हसे घरापर्यंत कॉंक्रिटीकरण करणे. | १७५००० | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | १७५० | | | |
| ०५. | वडघर बौद्धवाडी रत्नमाला जाधव ते सार्वजनिक शौचालयपर्यंत गटार बांधणे. | २५६७३६ | १५ वा वित्त आयोग | २०२१-२०२२ | २५६७ | | | |

**अटी/शर्ती**

✻ १. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळात पहावयास मिळेल. ✻ २. इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल. (इसारा रक्कम न भरल्यास निविदा अवैध ठरविण्यात येईल) ✻ ३. निविदा किंमत नापरतावा समजावी. ✻ ४. नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील. ✻ ५. ठेकेदार नोंदणीकृत (Register) असावा. ✻ ६. निविदा मंजूर केल्यास रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. ✻ ७. ५% टक्के सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल. ✻ ८. इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामाचा दर्जा पाहून परत मिळेल. ✻ ९. वर्कऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रा.पं.ने काम करुन घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार राहावे लागेल. ✻ १०. वरील अटी व शर्ती मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

**सही/-**
**(श्री. नं.कृ. भगत)**
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वडघर
ता. पनवेल, जि. रायगड

**सही/-**
**(श्री. मुकेश ना. कांबळे)**
प्रशासक
ग्रामपंचायत वडघर
ता. पनवेल, जि. रायगड





## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत बुधवार, दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे**

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)**

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर ■ ७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोवॅक्सिन

- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ९. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- १०. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- ११. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १३. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### कंटेनरच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** कंटेनरच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर पुणेकडे जाणाऱ्या लेनवर मंगळवारी (दि. २२) पहाटे घडली आहे. अन्वर हुसेन अब्दुज अजीज पठाण (वय ५२) हे रस्ता ओलांडत असताना अज्ञात कंटेनरची त्यांना धडक बसली. या अपघातात ते गंभीररित्या जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर कंटेनरचालक वाहनासह पसार झाला आहे. अपघाताची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये अल्पवयीन मुलाचे अपहरण

**पनवेल :** खांदा कॉलनी सेक्टर १२ येथील बालग्राम महाराष्ट्र पंचायत संकुलातून १२ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण करण्यात आले आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालग्राम आश्रमातील मुलांची शाळेत जाण्याची तयारी चालू असताना १२ वर्षीय मुलगा इतर मुलांसोबत खेळत होता, मात्र काही वेळानंतर तो मुलगा दिसून आला नाही. त्याचा शोध घेतला असता तो सापडून आला नाही. त्याचा रंग सावळा, उंची साडेतीन फूट, अंगाने मजबूत, नाक सरळ आहे. गळ्यात काळा दोरा असून अंगात शर्ट आणि बरमूडा घातलेला आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा बोलता येते. या मुलाला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले आहे.

### अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**मोहोपाडा :** खाने आंबिवली थांब्याजवळ दुचाकीचा अपघात होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. दापिवली गावातील निखिल धनाजी पाटील (वय २१) हा मोटरसायकल (एमएच-१४,जेव्ही-७२३९) वरून दांड रसायनी रस्त्यावरून जाताना त्याची डंपरला पाठीमागून जोरदार धडक बसली. या अपघातात निखिलचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची नोंद रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून याबाबत पुढील तपास सुरू आहेत.

### मोलकरणीने चोरले लाखोंचे दागिने

**पनवेल :** घरकाम करण्याच्या बहाण्याने विश्वास संपादन करून घरातील लाखो रुपये किमतीचे दागिने चोरणाऱ्या महिलेस खारघर पोलिसांनी बीड, कात्रज पुणे येथून ताब्यात घेतले आहे. लिला चंतुरी गौडा (वय ३६) यांनी घरकामास ठेवलेल्या महिलेने सोन्याचे दागिने चोरी केल्याची तक्रार खारघर पोलिसांत केली. त्यानुसार तांत्रिक तपास करून महिला आरोपी निता श्याम गर्जे (वय २७) कात्रज पुणे येथून अटक करण्यात आली. तिच्याकडून ३,६९,९५० रुपयांचे सोन्याचे चोरी केलेले दागिने जप्त करण्यात आले आहेत.

### मोबाइल पळवणारा चोरटा अटकेत

**पनवेल :** खारघर परिसरात सराईत मोबाइल चोरट्यास खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. खारघर येथे राहणारे विनोद शंकरराव चाटे (वय ३८) सेक्टर २७ रांजणपाडा ते गुरूद्वारा रोडवर पायी चालत असताना आरोपी व त्याच्या साथीदाराने मोटरसायकलवरून पाठीमागून चाटे यांच्या हातातील ६० हजारांचा मोबाइल पळवला. त्यानुसार खारघर पोलिसांनी आरोपी काशिम मुक्तार दराणी उर्फ छोटा कासीम उर्फ तलब (वय २२, रा. आंबिवली, कल्याण) अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरी केलेला मोबाइल जप्त करण्यात आला आहे.



### सिप्ला कंपनीतर्फे स्वच्छता मोहीम

**रसायनी :** सिप्ला कंपनीच्या पाताळगंगा येथील कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि. १९) पुन्हा एकदा स्वच्छता मोहीम राबविली. कंपनीच्या युनिट २ समोरील अंदाजे ७०० मीटर रस्त्यावर (सिपला कंपनी ते इंडोको रेमेडीज लिमिटेड) ही मोहीम राबविण्यात आली. यामध्ये जवळपास ८० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. या स्वच्छता मोहिमेमध्ये जवळपास चार ट्रक भरेल इतका कचरा गवत इत्यादी वस्तू गोळा करण्यात आल्या व त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली. या वेळी कंपनीचे साईटहेड पराग देशमुख तसेच कंपनीचे साईट एचआरहेड विनायक काळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

### केबीपी कॉलेजमध्ये शिवजन्मोत्सव सप्ताह

**नवी मुंबई :** रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये शिवजयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव सप्ताहाचे आयोजन केले होते. छत्रपती शिवाजी पारायण, डोळे तपासणी, रक्तदान, महिला संरक्षण प्रशिक्षण शिबीर, गोधडी वाटप, शिवकालीन मर्दानी खेळ असे उपक्रम राबवण्यात आले. शिवचरित्राचे अभ्यासक धिरेंद्र ठाकूर यांचे शिवव्याख्यान झाले. प्राचार्या डॉ. शुभदा नायक, एनएसएसचे प्रकल्प अधिकारी व चेअरमन डॉ. एल. व्ही. गवळी, प्रा. पी. जी. भाले, प्रा. एन. नलावडे, प्रा.एस.भागवत, एनएसएस संवससेवक ऋषिकेश क्षीरसागर, राजेश गावडे व रोहन तांबडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम झाले.

### उरण ओएनजीसी येथे रक्तदान शिबिर

**उरण :** ओएनजीसी उरण प्लान्ट व पेट्रोलीयम एम्पॉईज युनियन उरण यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २५) सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर द्रोणागिरी भवन येथे अयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन कार्यकारी निर्देशक संयत्र व्यवस्थापक (उरण) इंद्रजीत गुहा यांच्या हस्ते होणार आहे. या शिबिरास सरचिटणीस पीईयु मुंबई संतोष पाटील, उपाध्यक्ष एन. ए. खानविलकर, सेक्रेटरी विलेश घरत, समूह महाव्यवस्थापक प्रमुख ऑपरेशन अशोक तुळशीराम जाधव, महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन जॉर्ज विल्लयम केरकट्टा, सेक्रेटरी समाधान मढवी, मुख्य महाव्यवस्थापक प्रमुख अनुरक्षण गौतम सरदार, महाव्यवस्थापक अनुराग कौशिक, महाव्यवस्थापक प्रमुख मानव संसाधन हरीश भभानी, मुख्य महाव्यवस्थापक व पीईयु उपाध्यक्ष उरण इकबाल शेख, पीईयु कार्यकारी आणि सभासद उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती पीईयु उपाध्यक्ष उरण इकबाल शेख यांनी दिली.

# पाणीकपातीचा निर्णय रद्द करा; अन्यथा आंदोलन

## ▪ आमदार गणेश नाईक यांचा महापालिकेला इशारा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने आठवड्यातून एक दिवस संध्याकाळी पाणीकपातीचा घेतलेला निर्णय नवी मुंबईकरांसाठी अन्यायकारक असून तो मागे घ्यावा, अन्यथा या विरोधात रस्त्यावर उतरून लोकशाही पध्दतीने तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबई पालिका प्रशासनाला दिला आहे.

महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना आमदार गणेश नाईक यांनी या संदर्भात मंगळवारी (दि. २२) सडेतोड पत्र लिहले असून पाणीकपातीचा निर्णय अतिशय चुकीचा असल्याचे स्पष्ट केले आहे. मोरबे धरणात पुरेसा पाणीसाठा असताना पाणीकपात कशाला? मोरबे धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्यासाठी पाणीकपातीचा निर्णय घेण्यात आल्याचे पालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात येत असले तरी मोरबे धरणात २० सप्टेंबर २०२२ पर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध असताना नागरिकांवर आताच



पाणीकपात लादणे अन्यायकारक असल्याचे आमदार नाईक यांनी म्हटले आहे.

नवी मुंबईत अगोदरच अनियमित आणि असुरळीत पाणीपुरवठयाचा त्रास आहे. त्यात आता एक दिवस सायंकाळी पाणीपुरवठा पालिका बंद ठेवणार असल्याने नागरिकांच्या हालात भरच पडणार आहे. तुर्भे, नेरूळ, ऐरोली, घणसोली, बेलापूर, कोपरखैरणे, वाशी इत्यादी भागातील नागरिकांना पाणीटंचाईचा मोठा फटका बसणार आहे. एमआयडीसीकडून नवी मुंबई पालिका क्षेत्रात देय पाणीपुरवठा पुर्णपणे होत नाही. दिघा, ऐरोली, घणसोली हे भाग एमआयडीसीच्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून असल्याने या भागात पाणीटंचाईचा सामना नागरिकांना करावा लागतो आहे.

आमदार गणेश नाईक यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याबरोबर आजवर झालेल्या बैठकांमधून नवी मुंबईकरांना पुरेसे आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची मागणी केलेली आहे. एमआयडीसीकडून नवी मुंबईला होणारा पाणीपुरवठा अन्यत्र वळविण्यात येतो आहे. त्यामुळे नवी मुंबईचा पाणीपुरवठा एमआयडीसीने कमी केला आहे. ही बाब आमदार नाईक यांनी पालिका प्रशासनाच्या वेळोवेळी लक्षात आणून दिली आहे. महापालिका प्रशासनाच्या एमआयडीसीकडून नवी मुंबईच्या हक्काचे पाणी मिळवून घ्यावे, अशी मागणी आमदार नाईक यांनी केली आहे. त्याचबरोबर पाणीकपातीचा निर्णय तातडीने मागे घेतला नाही तर लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून जनतेसमवेत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## गृहसंकुलातील विविध समस्या सोडविण्यासाठी सिडकोला पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळाने घणसोली सेक्टर १०मध्ये उभारलेल्या गृहयोजनेतील रहिवासी विविध समस्यांनी त्रस्त असून या समस्या सोडविण्याची मागणी ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार गणेश नाईक आणि ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे प्रथम आमदार संदीप नाईक यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय-संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्याकडे सोमवारी (दि. २१) लेखी पत्र देवून केली आहे. संदीप नाईक यांनी डॉ. मुखर्जी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या गृहसंकुलाच्या समस्या त्यांच्यासमोर मंगळवारी मांडल्या.

सिडकोने १४,८३८ घरांसाठी २०१८ मध्ये कळंबोली, तळोजा, घणसोली या भागातील लॉटरी काढली. घणसोली सेक्टर १० येथे १२७२ घरांची निर्मिती केली आहे. लाभार्थ्यांपैकी बहुसंख्य लाभार्थी या गृहसंकुलात रहावयास आले आहेत. त्यांना घरांचा ताबा देवून सहा महिने होत आले आहेत, परंतु सुरूवातीपासूनच या गृहसंकुलातील रहिवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो आहे. पाणीटंचाई, अस्वच्छ पाण्याचा पुरवठा, इमारतींना पाण्याची गळती, सोसायटीची स्थापना, सुरक्षिततेचा प्रश्न, चोरीच्या वाढत्या घटना, रस्ते, विद्युत दिवे, लिफ्ट, अपुरे सफाई कर्मचारी, अशा सर्व असुविधा दूर करून रहिवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार गणेश नाईक आणि माजी आमदार संदीप नाईक यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय-संचालक डॉ. मुखर्जी यांच्याकडे केली आहे. डॉ. मुखर्जी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे.

## सराईत मोबाइलचोर अटकेत

**साडेचार लाखांचा मुद्देमाल हस्तगत**

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल यांच्याकडून घरातील उघडे दरवाजे, तसेच शटर आणि गर्दीच्या ठिकाणाहून मोबाइल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून चार लाख ५० हजार रुपये किमतीचे एकुण २८ मोबाइल हस्तगत करून नवी मुंबई, पुणे आयुक्तालयातील एकुण १० गुन्हे उघडकीस आणले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील मोबाइल चोरीच्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्याने विशेष मोहिम राबवुन मोबाइल चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळुन वेळीच प्रतिबंध करण्याबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने गुन्हे



शाखा, कक्ष २, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली समांतर तपास करीत असताना सलमान इक्बाल मुकादम (वय २३) यास सापळा रचून पोलिसांच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्याकडून चार लाख ५० रुपये किमतीचे एकूण २८ मोबाइल हस्तगत केले आहेत.

## कळंबोलीत ई-श्रम महानोंदणी अभियान

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे नगरसेवक अमर अरुण पाटील यांनी कळंबोली प्रभाग क्रमांक ७ मध्ये मोफत ई-श्रम महानोंदणी अभियान शनिवार (दि. १९) व रविवार (दि. २०) आयोजित केले होते. या कार्यक्रमात २७० नागरिकांनी लाभ घेतला.



या कार्यक्रमात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून या वेळी कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, नगरसेविका प्रमिला पाटील, नगरसेवक बबन मुकादम, जिल्हा सचिव अशोक मोटे, कळंबोली महिला अध्यक्ष मनीषा निकम, निता अधिकारी, श्वेता नगराळे, आबा घुटुकडे, संदीप भगत, दिलीप बिष्ट आदी उपस्थित होते, अशी माहिती कार्यालयीन चिटणीस जगदीश खंडेलवाल यांनी दिली.



## उरण पोलीस ठाण्यात हळदीकुंकू

**उरण : वार्ताहर**

उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच पोलीस ठाण्यात हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दंडाधिकारी उरण कोर्ट जज्ञ प्रियंका पठाडे, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी नगरसेवक अफशा मुकरी, माजी उपनगराध्यक्ष नाहिदा ठाकूर, सीमा घरत यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

भारतरत्न गाणंसम्राज्ञी लता मंगेशकर यांना आदरांजली वाहण्यात आली. महिलांना हळदी कुंकू करून गुलाब पुष्प व भेटवस्तू देण्यांत आल्या. या वेळी गौरी देशपांडे, गौरी मंत्री, दीपा मुकादम, पत्रकार तृपी भोईर, पत्रकार संगिता पवार, कुसम ठाकूर, सामिया बुबेरे, पीएसआय सोनावणे यांच्यासह पोलीस कर्मचारी सुहास चव्हाण व महिला कर्मचारी अंजना गायकवाड, रचना ठाकूर, प्रदेवी पाटील, कविता हाते, प्रीती म्हात्रे, अमिता पाटील, सुप्रिया ठाकूर, प्रियंका पाटील, सुरेखा राठोड, भीमराज शिंदे, हरिदास गीते, सचिन पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी पाटील यांनी केले.

## बेलपाडा मार्केटमध्ये शौचालय बांधून द्या

**भाजप नेते प्रभाकर घरत यांची मागणी**

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील सेक्टर ४च्या भूखंड क्रमांक १९ए मधील मार्केटमध्ये सार्वजनिक मुतारी तसेच शौचालय बांधून देण्यात यावे, अशी मागणी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी सिडको व महापालिका प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खारघर सेक्टर ४च्या भूखंड क्र. १९ए मधील मार्केटमध्ये मुतारी तसेच शौचालयाची सुविधा नसल्यामुळे लोक उघड्यावर लघुशंका करतात. त्यामुळे तेथे घाण व मच्छर यांचा त्रास तेथील नागरिकांना होतो. तो होऊ नये यासाठी मुतारी व शौचालय लवकरात लवकर बांधून दिले, तर तेथील नागरिकांची गैरसोय होणार नाही व परिसर स्वच्छ राहील, असे प्रभाकर घरत यांनी निवेदनात नमूद केले आहे.





**कामोठे : पनवेल महापालिका प्रभाग समिती 'क'च्या सभापती अरुणा प्रदीप भगत यांच्या नगरसेवक निधीतून सेक्टर २१ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उद्यान येथे नवीन वॉकिंग ट्रॅक बनविण्यात येत आहे. या ट्रॅकचे भूमिपूजन सभापती अरुणा भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रभागातील नागरिक उपस्थित होते.**



**पनवेल : तालुक्यातील सोमटणे येथील शिवप्रेमी श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्थान या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शिवजयंतीनिमित्त किल्ले प्रतापगड दर्शन मोहीम राबविली.**

## सिडकोकडून ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तांतरण

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोकडून सोमवारी (दि. २१) दुसऱ्या टप्प्यात पनवेल तालुक्यातील, सिडको अधिकारक्षेत्रातील ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरण वन विभागाच्या कांदळवन कक्षाला करण्यात आले. सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या हस्ते मुंबई कांदळवन संधारण घटक विभागीय वन अधिकारी एम आदर्श रेड्डी यांना हे कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरण करण्यात आले.

या आधीच्या पहिल्या टप्प्यात सिडकोने आपल्या अधिकारक्षेत्रातील २८१.७७ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तांतरण केले आहे. कांदळवनांचे पर्यावरणाच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेऊन,



कांदळवनांचे राखीव वने म्हणून संरक्षण व्हावे, या उद्देशाने सिडकोकडून कांदळवनांचे हस्तातंरण करण्यात आले आहे.

नवी मुंबईचे नियोजन करताना, सिडकोने उद्यान, क्रीडांगणे आणि एनडीझेडसह सुमारे ४० टक्के क्षेत्र हरितक्षेत्रासाठी ठेवले होते. आतापर्यंत सिडकोने ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अंदाजे २००० हेक्टर जमीन वनविभागाला सुपूर्द केली आहे, असे डॉ. संजय मुखर्जी यांनी सांगितले.

या वेळी सिडको सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, मुख्य नियोजनकार (बांधकाम परवाना) रविकुमार, अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन) सतिशकुमार खडके आणि सिडकोतील अन्य अधिकारी त्याचप्रमाणे मुंबई कांदळवन कक्ष यांच्यातर्फे डी. एस. कुकडे, नवी मुंबई वनक्षेत्रपालदेखील उपस्थित होते.

## कामोठ्यात हळदीकुंकू, सत्कार समारंभ

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर १७ येथील शिलालेख सोसायटीमध्ये नगरसेविका हेमलता रवि गोवारी व सामाजिक कार्यकर्ते रवि गोवारी यांच्या उपस्थितीमध्ये हळदीकुंकू समारंभ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमामध्ये नगरसेविका हेमलता गोवारी यांचा सत्कार करण्यात आला.

मागील तीन ते चार महिन्यांपासून सोसायटीमध्ये गंभीर पाणी प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे सोसायटी कार्यकारणी व महिलाने हा गंभीर पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी नगरसेविका हेमलता गोवारी यांच्याकडे जाऊन या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची विनंती केली. गोवारी त्यांनी लगेच वेळेचाही विलंब न लावता सोसायटीमध्ये जाऊन समस्येचे गांभीर्य ओळखले व या विषयाबाबत सिडको अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला आणि पाणी प्रश्न हा मार्गी लावला. त्यामुळे नगरसेविका हेमलता गोवारी व सामाजिक कार्यकर्ते रवि गोवारी यांचा सोसायटीमधील नागरिकांनी व महिला मंडळाने सत्कार केला.

या वेळी सोसायटीचे अध्यक्ष, सदस्य संतोष चव्हाण, महिला सुषमा वास्कर, शुभांगी कदम आदी उपस्थित होते.



संपादकीय

# भाषेचे राजकारण

सध्या महाराष्ट्रात राजकारणाची भाषा आणि भाषेचे राजकारण असे दोन मुद्दे प्रामुख्याने ऐरणीवर आलेले दिसतात. राजकारणाच्या भाषेचे कवित्व थांबायला तयार नाही. चहुबाजूंनी खरपूस टीका होऊनदेखील सत्ताधारी पक्षाचे काही नेते आपली शिवराळ भाषा आवरायला तयार नाहीत. राजकारणातील भाषेचा योग्य तो समाचार मतदार आगामी निवडणुकीत घेतीलच. तथापि दुसरा मुद्दा भाषेच्या राजकारणाचा आहे.

**मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी दिल्ली दरबारी जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे चित्र दिसते आहे. हे नुसतेच चित्र आहे की वरवरचा देखावा या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. मध्यंतरी संसदेचे अधिवेशन सुरू असताना काही खासदारांनी मराठी भाषेच्या अभिजात दर्जाचे काय झाले, असा प्रश्न विचारला होता. केंद्रीय सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी त्याला सकारात्मक आणि स्पष्ट उत्तरदेखील दिले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर मात्र मराठी भाषेच्या अभिजात दर्जाच्या मुद्द्यावर राजकारणच अधिक ठळकपणे घडताना दिसू लागले आहे. महाविकास आघाडी सरकारमधील ज्येष्ठ नेते व मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी जनअभियान छेडण्याची घोषणा केली. काही महिन्यांपूर्वी नाशिक येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातदेखील अभिजात दर्जाचा मुद्दा चर्चेत आला होता. काही मराठी कलावंत, खेळाडू आणि साहित्यिकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन मराठीला अभिजात दर्जा देण्याचे मागणीपत्र माननीय राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याकडे धाडण्याचे प्रयत्न झाले. वास्तविक अशा कुठल्याही प्रयत्नांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणार नाही हे सर्व संबंधितांना ठाऊक आहे. मराठी भाषेचा दुस्वास ही दिल्लीश्वरांसाठी काही नवीन गोष्ट नव्हे. राजवट कुठल्याही पक्षाची असली तरी दिल्लीदरबारी मराठी भाषेला कमी लेखले जाते ही जुनीच तक्रार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर चित्र भराभरा बदलण्यास सुरूवात झाली. आजही मराठीबाबत दिल्लीदरबारी सारे काही आलबेल आहे, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. तरीही मराठीबाबतचा सापत्नभाव मोदी सरकारने जवळपास नष्ट केला ही वस्तुस्थिती सर्वच पक्षांचे मराठी खासदार सांगतील, कारण खुद्द पंतप्रधान मोदी यांना मराठी भाषा चांगली अवगत आहे आणि त्याचे प्रशस्तीपत्र दुसऱ्या कुणी नव्हे तर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच नुकतेच एका ऑनलाइन कार्यक्रमात दिले होते. मराठी भाषेपुढील आव्हाने वेगळीच आहेत. त्यासाठी तिला अभिजात दर्जा मिळण्याची आवश्यकता नाही असा युक्तिवाद काही जण करतात. आज ना उद्या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यासाठी गेले दशकभर मराठीजन प्रयत्न करत आहेत. २०१३ साली प्रा. रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखालील समितीने संपूर्ण अभ्यासाअंती अहवाल सादर करून मराठी भाषेचे अभिजातत्व सप्रमाण सिद्ध करून दाखवले होते. त्यानंतर नऊ वर्षांनी पुन्हा एकदा हा मुद्दा ऐरणीवर आला आहे, तो मराठीच्या प्रेमाखातर नव्हे तर आगामी महापालिका निवडणुकांचे वेध लागल्यामुळे. मराठी भाषेच्या मुद्द्याचे राजकारण करण्याऐवजी तिला अभिजात दर्जा कसा मिळेल यासाठी प्रामाणिक प्रयत्न व्हायला हवेत. त्या प्रामाणिक प्रयत्नांचीच सध्या वानवा आहे.**

# कालिकापुराण : मराठी भाषेची प्राचिनता सिद्ध करणारा ग्रंथ




मराठी भाषेची उत्पत्ती प्राचीन आहे. हाल सातवाहनाने इसवी सनाच्या पहिल्या शतकात संपादीत केलेला प्राकृत ग्रंथ गाथा सप्तशती, इसवी सनाच्या ९व्या शतकातला श्रावणबेळगोळ शिलालेख, नाणेघाटातील नागनिकेचा लेख, इ.स.१०१२ मधील आक्षीचा शिलालेख, इ.स. १३ व्या शतकातील ज्ञानेश्वरी, लिळाचरित्र व विवेकसिंधू हे अत्युच्च दर्जाचे ग्रंथ मराठीच्या अभिजातपणाला बळकटी देतात.

मराठी भाषा अभिजात असल्याचे साहित्य अकादमीने मान्य करुनही अजुनही मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळालेला नाही. मात्र मराठीत प्राचीन व मध्ययुगीन काळात निर्माण झालेले उच्च दर्जाचे साहित्य लवकरच हा दर्जा मराठीस प्राप्त करुन देतील यात शंका नाही.

मराठी भाषेच्या समृद्धीमध्ये भर घालणारा एक दुर्मिळ ग्रंथ म्हणजे कालिकापुराण. कालिकापुराण ग्रंथाचा कर्ता शारंगधर हा असून या ग्रंथात एकूण ३१ अध्याय व १७३४ ओव्या आहेत. सदर ग्रंथात सोमवंशाचे वर्णन करुन कालिका महात्म्य वर्णन केले आहे. कासार समाजाची उत्पत्ती देणारा हा ग्रंथ अमुद्रीत स्वरुपात होता. सन १८९३ साली पुण्यातील जगद्धितेच्छु छापखान्याने या ग्रंथाच्या काही मुद्रीत प्रती काढल्या मात्र कालांतराने या प्रतीही दुर्मिळ झाल्या.

परभणीचे एक अभ्यासू शिक्षक आळंदकर यांना कालिकापुराणाची एक दुर्मिळ प्रत मिळाली व त्यांनी मला यावर अभ्यास करण्याची विनंती केली. त्यानुसार त्यांनी पुण्यात येऊन सदर ग्रंथाची छायांकित प्रत माझ्याकडे दिली. ग्रंथाचा कर्ता सारंगधर स्वतःचा परिचय फक्त 'महामायेचा कुमरु' असा करतो व याव्यतिरिक्त तो स्वतःविषयी काहीही लिहीत नाही.

ग्रंथाच्या सुरुवातीला तो, हा ग्रंथ संस्कृत पद्मपुराणातल्या उत्तरखंडातील कालिका महात्म्यावरुन लिहिल्याचे सांगतो व या ग्रंथाचे मराठी लेखन करण्यामागचा उद्देश पुढीलप्रमाणे स्पष्ट करतो

**'यासंस्कृताच्याआगरी ।**
**ग्रंथी महाठीअर्थुभरी ।।**
**कथा प्रगटकरी। दावीश्रोतयाते।।**
**हेसंस्कृताचीपेटी ।**
**उघडुनियाप्राकृतींकरीदृष्टी ।।**
**कथाबोलेनमर्हाटी । हरिकिर्तीची।।'**

**या ग्रंथाच्या चौदाव्या अध्यायात तो विठ्ठलाची स्तुती करताना म्हणतो की,**

**'पाहेपुंडलिकुभक्तपुर्णगाभा।**
**अठ्ठाविसयुगेतुंतेथेउभा ।।**
**कावृंदावनीपद्मनाभा । संततअससी ।।'**

ग्रंथाची भाषा यादवकालीन असल्याचे लिखाणावरुन समजते मात्र या ग्रंथाचा काळ सारंगधराने लिहिला नसल्याने नेमक्या कुठल्या काळात सदर ग्रंथ निर्मिला गेला, हे कळणे कठीण होऊन बसते. अशावेळी स्वतः सारंगधरच या कोड्याचे उत्तर त्याने दिलेल्या देवगिरीच्या यादव राजांच्या वंशावळीतून देतो. देवगिरीच्या यादव राजांच्या सात ते आठ वंशावळी प्रसिद्ध आहेत मात्र यापैकी एकही वंशावळीचा एकमेकांशी मेळ बसत नाहीत. सारंगधराने कालिकापुराणात दिलेली वंशावळ वैशिष्ट्यपुर्ण असून सदर वंशावळ देवगिरीच्या यादवांच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या इतिहासात मोलाची भर घालेल.

वंशावळ पुढीलप्रमाणे आहे.

**गळेसीपुत्रकोथळी । कोथळीसी नुरु (नृसिंह) ।। नुरुचा भोगु ।। भोगूचा आध्या ।। आध्याचा कोथळी ।। कोथळीचा दंडप्रहरी (दृढप्रहर) ।। दंडप्रहरीचा शिंगणू (सिंघण) ।। शिंगणाचा भिलमु (भिल्लम) ।। भीलमाचा अमरगंगी (अमरगंगेय) ।। अमरगंगीचा जैत्रपाळ (जैतुगी) ।। जैतपाळाचा कान्हादंडदेव (कान्हा उर्फ कृष्ण).**

सदर वंशावळीतील नृसिंह, दृढप्रहर, सिंघण, भिल्लम, अमरगंगेय, जैतुगी, कान्हा ही नावे देवगिरीच्या प्रसिद्ध यादव राजांची असून ही वंशावळ कान्हा उर्फ कृष्ण या राजापर्यंत आहे. कान्हानंतर त्याचा लहान भाऊ महादेव हा सुद्धा पराक्रमी निघाला मात्र पुढे महादेव वारल्यानंतर महादेवाचा पुत्र अम्मण गादीवर बसला असता त्याला कान्हाचा पुत्र रामदेव याने पदच्युत केले व स्वतः गादीवर बसला.

रामदेव हा यादव साम्राज्याचा अखेरचा सम्राट. रामदेव राजाच्या काळात ज्ञानेश्वरी या ग्रंथाची निर्मिती झाली. शारंगधराने दिलेल्या वंशावळीचा विचार करावयाचा तर सदर वंशावळ कृष्ण उर्फ कान्हेर राजापर्यंत आहे व त्यानंतरच्या महादेव व रामदेव या प्रसिद्ध राजांचा सदर वंशावळीत उल्लेख सापडत नाही. त्याअर्थी कालिकापुराण या ग्रंथाची निर्मिती कृष्णदेवाच्या कारकिर्दीत झाली असावी, हे अनुमान काढता येते. कृष्ण उर्फ कान्हेर राजाचा काळ इ.स. १२४७ ते इ.स. १२६० मानला जातो. ज्ञानेश्वरी व लिळाचरित्र या ग्रंथांची रचना रामदेवाच्या कारकिर्दीतील मानली जाते. कारण या दोनही ग्रंथात रामदेवाचा उल्लेख येतो. कालिकापुराणात महादेव व रामदेवाचाही उल्लेख मिळत नसल्याने हा ग्रंथ ज्ञानेश्वरी व लिळाचरित्र यांच्या समकालीन अथवा काही वर्षे अगोदर लिहीला गेला असला पाहिजे.

मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळवण्यासाठी अनेक वर्षे प्रयत्न सुरु आहेत. २०१३ साली प्रा. रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली 'अभिजात मराठी भाषा समिती' स्थापून सदर समितीचा अहवाल २०१३ साली सरकारला देण्यात आला आहे. मराठी भाषेत प्राचीन व मध्ययुगात विपुल लिखाण झाले आहे व दिवसेंदिवस नवीन शोध लागत आहेत. कालिकापुराण हे मराठीला अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळण्याकडे टाकलेले आणखी एक पाऊल आहे. आगामी काळात नवे संदर्भ मिळतील व लवकरच मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळेल हीच आशा करूयात.

**–सिद्धार्थ सोष्टे**

# रोह्यात रंगले कवी संमेलन

**रोहा : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद रोहा आणि किशोर तावडे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कवी संमेलनाला जिल्ह्यातील साहित्यिकांनी उदंड प्रतिसाद दिला.

मराठी साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. एल. बी. पाटील यांच्या हस्ते या कवी संमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. कोमसापचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनात आकाशवाणीचे ज्येष्ठ समालोचक किशोर सोमण यांनी मार्गदर्शन केले.

कोमसापचे मुरूड शाखा अध्यक्ष संजय गुंजाळ, रोहा शाखा अध्यक्ष सुखद राणे, तळा अध्यक्ष हेमंत बारटक्के, माणगाव शाखा अध्यक्ष अजित शेडगे, गोरेगाव अध्यक्ष केदार खुळे, उरण अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, खोपोली अध्यक्ष सुधाकर चव्हाण, शिक्षिका सायली तपकीरे, संध्या दिवकर, विजय दिवकर, हनुमंतराव शिंदे, नारायण पानावकर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक कवीं या संमेलनात सहभागी झाले होते. सूत्रसंचालन निखिल दाते, संध्या दिवकर यांनी केले. सुखद राणे यांनी आभार मानले. किशोर तावडे मित्र मंडळाचे सर्व सदस्य व कोमसापच्या रोहा शाखेच्या सर्व सदस्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



(छाया : महादेव सरसंबे)

# पाली-भूतिवली धरण परिसरात कालव्यांचे पाणी खळाळणार

## बांधणीसाठी ९७ कोटी रुपयांची तरतूद

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील पाली-भूतिवली धरणाच्या कालव्यांची कामे करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे तब्बल १९ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर रेल्वेपट्‌ट्यातील गावांमध्ये कालव्यांचे पाणी खळाळणार आहे.



(छाया : संतोष पेरणे)

कर्जत तालुक्यातील रेल्वेपट्‌ट्यातील पाणीटंचाईचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी आणि या भागातील ११०० हेक्टर जमीन ओलीताखाली आणण्यासाठी पाली-भूतिवली हा लघुपाटबंधारे प्रकल्प उभारण्यात आले आहे. पाली, भूतीवलीसह तीन गावे स्थलांतरित हे धरण उभारण्यात आले आहे. १९९२मध्ये धरणाचे काम सुरू झाले आणि मुख्य भिंत २००४ मध्ये पूर्ण झाल्यापासून धरणात पाणीसाठा होऊ लागला आहे.

यानंतर धरण परिसरातील ११०० हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्यासाठी एक किलोमीटर लांबीचा मुख्य, पाच किलोमीटर लांबीचा डावा आणि नऊ किलोमीटर लांबीचा उजवा कालवा बंधण्याची आवश्यक होती, मात्र धरणातील पाणी सोडण्यासाठी कालवे बांधले नव्हते. कालव्यांचे काम सुरु करताना वन विभागाने अडथळा आणला आणि तेव्हापासून कालव्यांची कामे पुढे सरकली नाहीत. त्यामुळे एवढी वर्षे भातशेतीला पाणी मिळाले नाही. गेली १९ वर्षे या धरणात पाणी पडून आहे.

दरम्यान, पाली-भूतिवली धरणाचे एकूण १५ किलोमीटर लांबीचे कालवे बांधण्यासाठी आता पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून ९७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून कालवे बांधले जाणार आहेत. त्यामुळे कर्जत तालुक्यातील आसल, भूतीवली, आसलपाडा, बेकरे, माणगाव, आंबिवली, कुंभे, एकसल, भानसोली, उकरूळ, चिंचवली, बार्डी, डिकसळ, गारपोली, उमरोली, कोषाने, आषाणे, सावरगाव, वांजळे, वावे या गावातील शेतजमीन ओलिताखाली येणार आहे.

# रोहा ब्राह्मण मंडळातर्फे शिवजयंतीनिमित्त व्याख्यान



(छाया : महादेव सरसंबे)

**रोहा : प्रतिनिधी**

येथील ब्राह्मण मंडळाने शिवजयंतीनिमित्त सुप्रसिद्ध शिवव्याखयाते प्रतिक मिलिंद पाटणकर यांचे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अपरिचित लढाया व व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. प्रतिक पाटणकर यांनी आपल्या अमोघ वक्तृत्वशैलीने उपस्थितांची मने जिंकली.

सुरुवातीला ब्राह्मण मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले व व्याख्याते प्रतिक पाटणकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मंडळाचे उपाध्यक्ष आनंद काळे, सचिव निखिल दाते, खजिनदार चैतन्य आठवले, कार्यकारिणी सदस्य विदुला परांजपे, नेहा आवळसकर, श्रीनिवास रिसबुड आदींसह सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## आरोग्य प्रहर

# मधुमेहींनी काजूचे सेवन केल्यास मिळू शकतात फायदे

मधुमेह असणाऱ्या रुग्णांसाठी काजू खाणे फायदेशीर असल्याचे सांगितले जाते. शरीरातील साखरेचे प्रमाण वाढत असेल तर आणि तेव्हा तुम्ही काजूचे सेवन करत असाल तर तुमच्या शरीरातील साखरेवर नियंत्रण मिळवू शकता. त्यामुळे आम्ही तुम्हाला काजू खाण्याचे फायदे सांगणार आहोत.

तुम्ही जर काजू खात असाल तर तुम्हाला काजूमध्ये कोण कोणते पोषक तत्व असतात हे तुम्हाला माहिती असणे गरजेचे आहे. काजू खात असाल तर काजूमध्ये फॉस्फोरस,



मॅग्निशिअम, प्रोटीन, फोलेट, आयरन, फायबर, अँटी ऑक्सिडेंट,विटामिन आणि मिनरल, सेलेनियमची मात्रा जास्त असते. त्यामुळे काजूला तुम्ही वेगवेगळ्या प्रकारे तुमच्या डायमटमध्ये काजूचा वापर करू शकता. असं म्हटलं जातं की, मधुमेह असणाऱ्या रुग्णांनी काजू खाणे गरजेचे आहे.

आपल्या आहारात यासाठी काजू सांगतात की, काजूमुळे पोटॅशिअम, फायबर, विटामिन सी हे गुणांमुळे फायदा होत असतो. तुमच्या आहारात काजू असेल तर शरीरातील साखरेच प्रमाण कमी करण्यास मदत होते. ज्या लोकांना मधुमेहाचा त्रास होतो, असे रुग्ण मानसिक तणावाखाली वावरत असतात. त्यामुळे अशा रुग्णांनी काजूचे सेवन केले पाहिजे. यामुळे इन्सुलिन वाढण्यासही मदत होते.

मधुमेह असणाऱ्या लोकांचे जर वजन वाढले असेल तर त्यांनीही काजूचे सेवन केले पाहिजे. काजूचे सेवन करत असाल तर तुमचे वजन कमी करण्यासाठी फायदा होतो. काही लोकांचे असे मत असते की, काजू खाल्ल्यामुले वजन वाढू शकते. त्यामुळे हा लोकांचा भ्रम मनातून काढून टाकला पाहिजे. कारण काजूमध्ये मॅग्नेशिअम, फायबर, कॉर्ब्स असते, यामुळे तुमचे वजन ते नियंत्रणात राहू शकते.

अनेक डायटीशियन मधुमेह असणाऱ्या रुग्णांना आहाराचे वेळपत्रक पाळायला सांगतो. मधुमेह असणाऱ्या लोकांना कमी मात्रा असलेले आणि जास्त फायदेशीर असा आहार खाण्याचा सल्ला दिला जातो. मात्र ही गोष्ट खरी आहे की, काजूचे सेवन जर तुम्ही करत असाल तर शरीराला चांगल्याप्रकारची शक्ती मिळते. त्यातही जर तुम्ही रोज दोन ते चार काजू खात असाल तर शरीराला त्याचा नक्कीच फायदा मिळतो.

ज्या रुग्णांना उच्च रक्तदाब असेल तर त्यांनी काजूचे सेवन केले तर त्यांना असलेला उच्च रक्तदाबाचा त्रास कमी होऊ शकतो. त्याबरोबरच जे लोक नेहमी काजूचे सेवन करतात, त्यांची किडनीही चांगली राहते. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्यानुसार तुम्ही काजूचे सेवन करा.

# खालापूर डोलवली येथे पदविका प्रदान समारंभ



(छाया : अरुण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील डोलवली येथील नॅशनल कॉलेज ऑफ योग अ‍ॅन्ड नॅचरोपॅथी या संस्थेचा रविवारी (दि. २०) डॉक्टर पदविका प्रदान समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष हरीश काळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात आल्या. संस्थेचे चेअरमन डॉ. ओमनाथ मिश्रा, उद्योजक संतोष कंगले, राजू खांडेकर, बिल्डर सुभाष सुर्यवंशी, बी. के. सिंग आदी या वेळी उपस्थित होते.

# किल्ले सुधागडावर स्वच्छता मोहीम

**पाली : प्रतिनिधी**

शिवजयंतीचे औचित्य साधून सुधागड किल्ल्यावर शनिवारी प्रशासनातर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सुरुवातीला गडाच्या पायथ्याशी दर्यागाव ठाकरवाडी येथे शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर किल्ले सुधागडवर जाऊन प्रथम शिवजयंती साजरी करण्यात आली. तसेच साफसफाई करण्यात आली.

उपसचिव डॉ. नामदेव भोसले, प्रांताधिकारी डॉ. यशवंतराव माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के-पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, तहसीलदार दिलीप रायण्णावार, रायगड जिल्हा परिषदेचे लेखाधिकारी श्री. कोळपे, गटविकास अधिकारी विजय यादव, कृषी अधिकारी अशोक महामुनी यांच्यासह सुधागड तालुक्यातील मधील सर्व विभागाचे कर्मचारी, स्थानिक सरपंच व पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

किल्ले सुधागडवर राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, पुरातत्त्व विभाग व स्थानिक प्रशासनाचे कर्मचारी तसेच बा रायगड या संस्थेचे सुमारे ३०० सदस्य सहभागी झाले होते.





(छाया : धम्मशील सावंत)

# ताकई रस्त्यासाठी सर्वपक्षीय नेते आक्रमक

## मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात ठेकेदाराला धरले धारेवर; आजपासून काम सुरू करण्याचे दिले

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीतील ताकई रस्त्याच्या काँक्रटीकरणाचे भूमिपूजन होवून वर्ष झाले. त्यानंतर अनेक महिने काम बंद असल्यामुळे या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे ताकई ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील सर्वपक्षीय नेत्यांनी सोमवारी (दि. २१) मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन ठेकेदाराला धारेवर धरले. ठेकेदाराने बुधवार (दि. २३) पासून काम सुरू करण्याचे आश्वासन दिले.



(छाया : अरूण नलावडे)

ताकई रस्त्याच्या कामासाठी एमएमआरडीएने चार कोटी ८० लाख रूपयांचा निधी दिला आहे. वर्षापूर्वी आमदार महेंद्र थोरवे यांनी भूमीपूजन केल्यानंतरही रस्त्याची अवस्था जैसे थे आहे. ठेकेदाराने हा रस्ता अनेक ठिकाणी खोदून ठेवल्याने पूर्वीपेक्षा आता रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अखेर ग्रामस्थांनी आक्रमक होत सोमवारी मुख्याधिकारी अनुप दुरे यांची भेट घेऊन ठेकादार आणि अभियत्यांवर विरोधात संताप व्यक्त केला. यावेळी स्थानिक माजी नगरसेवक सुनिल पाटील, आरपीआयच नरेंद्र गायकवाड़,शेकापचे किशोर पाटील, संदीप पाटील, विक्रम पाटील,अनिल खालापूरकर, अशपाक लोगडे यांच्यासह ताकई ग्रामस्थ उपस्थित होते.

काँक्रीटीकरणाचे काम सुरू करण्याआधी वनविभागाची परवानगी घ्या, आगोदरच रस्ता खोदू नका, असे सांगूनही ऐकले नाही, त्यामुळे संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाका आणि अभियत्यांवर कारवाई करण्याची मागणी सुनिल पाटील यांनी या वेळी केली.

ताकई रस्त्यावरील खड्ड्यामुळे मुलाचा तातडीने रुग्णालयात घेवून जाता आले नाही, त्यामुळे मुलाला जीव गमवावा लागला. असे सांगून नरेंद्र गायकवाड यांनी ताकई रस्ता किती बळी घेणार, असा सवाल उपस्थित केला. ताकई रस्त्याच्या निकृष्ट कामाला अभियंता जबाबदार असल्याचा आरोप संदीप पाटील यांनी या वेळी केला.

मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी उपस्थितांचे म्हणणे ऐकून ठेकेदाराला काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या. ठेकेदाराने बुधवारपासून काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. काम सुरू केल्यानंतर ते पूर्ण होईपर्यंत बंद करू नय, अन्यथा आमरण उपोषण आणि रास्ता रोको आंदोलन करू असा इशारा या वेळी किशोर पाटील यांनी दिला.

## बोलेरोची कट लागून दुचाकीला अपघात; एक ठार, एक जखमी

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पेणजवळील हमरापूर फाटा येथे दुचाकीला रविवारी (दि. २०) बोलेरो पिकअपची कट लागली. या अपघातात दुचाकी चालक सागर प्रकाश पाटील यांचा मृत्यू झाला तर मयूर संदेश भगत जखमी झाले.

फिर्यादी मयूर संदेश भगत (वय २२, रा. ताडवाडी पोस्ट, ता. मुरुड) यांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक २० फेब्रुवारी रोजी रात्रौ ११:१५ च्या सुमारास मयत सागर प्रकाश पाटील (वय ३२, रा. सातीर्डे, ता. मुरूड) हे आपल्या ताब्यातील दुचाकी (एमएच-०६,बीक्यू-४६९३) वरून मुरुड येथून कल्याण येथे जात होते. ते हमरापूर पुलावर आले असता बोलेरोने कट मारल्याने दुचाकीला अपघात झाला. या अपघातात सागर पाटील जखमी होऊन मृत्यू पावले. तर मयूर भगत जखमी झाले. अपघातानंतर बोलेरो पिकअप चालक पळून गेला.

या अपघातची नोंद दादर सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास उपनिरीक्षक भऊड करीत आहेत.


**पेण नगरपरिषद, पेण. जिल्हा-रायगड**

जा.क्रं.पेनप/का.७/भांडार/निविदा प्रसिध्दी/२०२२/३०२९ दिनांक :- २२/०२/२०२२

**जाहीर निविदा सूचना २०२२-२३**

पेण नगरपरिषदेच्या विविध विभागाकडील कामांकरिता भांडार विभागाकडून योग्य त्या अनुभवी व इच्छुक पुरवठादार/ठेकेदार यांचेकडून व्दिनोंद सिलबंद लिफाफा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत. १) डिजीटल बनसे छपाई (दिलेल्या मसुदयाप्रमाणे) करुन निश्चित स्थळी लावून देणेबाबत.२) सफाई कर्मचारी यांना मास्क, हॅन्डग्लोज, जॅकेट पुरविणे बाबत. ३) ऑफीस स्टेशनरी छपाई करणे ४) ऑफीस स्टेशनरी खरेदी करणे ५) नगरपरिषद मालकीचा कै. तुकाराम नारायण तथा मामा वास्कर जलतरण तलाव खाजगी व्यक्ती अथवा संस्था यांना भाडेमुल्यावर चालविणेस देणेबाबत. या कामांची जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करणेत येत आहे. पेण नगरपरिषद ,भांडार विभागात निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत दि. २३/०२/२०२२ ते दि.०४/०३/२०२२ स.११ ते सायं.५.०० वाजेपर्यंत विक्री व । स्विकारल्या जातील. सदर कामाच्या अटी -शर्ती व कामासंबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषद भांडार विभागात कार्यालयीन वेळेत (सुटटीचे दिवस खेरीज) मिळेल.


**सही /-**
**(जिवन पाटील)**
**मुख्याधिकारी पेण नगरपरिषद,पेण.**


## माणगावजवळ टेम्पोला इकोची धडक; दोघे जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

चालकाचा ताबा सुटल्याने माणगाव-पुणे रस्त्यावर सोमवारी (दि. २१) सायंकाळी इको गाडीने आयशर टेम्पोला धडक दिली. माणगावजवळील निजामपूर बागवाडी गावाच्या हद्दीत झालेल्या या अपघातात दोन जण जखमी झाले.

फिर्यादी नवनाथ नामदेव ढोकळे (वय २९, रा. वारक, ता. मुळशी, जि. पुणे) हे त्यांच्या ताब्यातील आयशर टेम्पो (एमएच-१२,एसएफ-८८६४) चालवीत सोमवारी सायंकाळी माणगाव-पुणे रस्त्याने माणगाव बाजूकडे येत होते. त्याचवेळी सुरेंद्र राजेंद्र सावंत (वय २६, रा. चाकणवाडी, ता. खेड, जि. पुणे) हे माणगाव बाजूकडून इकोगाडी (एमएच-१४,एचके-३७०९) चालवित जात होते. माणगावजवळील बागवाडी गावाच्या हद्दीत वळणावर चालक सुरेंद्र सावंत यांचे नियंत्रण सुटल्याने इकोगाडी ने आयशर टेम्पोला समोरून धडक दिली. या अपघातात इको चालक सुरेंद्र जाधव व अमोल शिवाजी पारधी (वय २८, रा. वाकी, ता. खेड, जि. पुणे) हे दोघे जखमी झाले.



## पेण उचेडे गावातील घरात ट्रक घुसला

**पेण :** तालुक्यातील उचेडे येथे मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या तुळशीदास म्हात्रे यांच्या घरात सिमेंट गोणीने भरलेला ट्रक घुसल्याने घराचे व जिन्याचे मोठे नुकसान झाले. या अपघातात एक महिला जखमी झाली आहे. तसेच घरासमोरील लोखंडी जिन्याचे व दरवाजात उभ्या असलेल्या दुचाकीचे नुकसान झाले.

पेणबाजूकडून वडखळ बाजूला जाणारा ट्रक (एमएच-०४,एचवाय- ४८३८) उचेडे बस स्टॉपवर आला असता चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने ट्रक थेट तुळशीराम म्हात्रे यांच्या घरात घुसला. गॅलरीचा कठडा आणि पायरीला धडकून सदरचा ट्रक घरातल्या जिन्यात अडकून राहिला म्हणून मोठा अनर्थ टळला.

## रोह्यात मटका, क्लब, चक्री जुगार जोरात

**रोहे : प्रतिनिधी**

शहराला अवैध धंद्यांचा विळखा बसला आहे. गेल्या १० वर्षातील सर्वात जास्त अवैध धंदे या वर्षी रोहा तालुक्यात सुरू आहेत. रोहा शहरात ठिकठिकाणी मटका, जुगाराचे क्लब, चक्री जोरात सुरू असून तेथे लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. डिसेंबर, जानेवारीमध्ये पोलिसांनी या अवैध धंद्यांवर वेळोवेळी कारवाया केल्या होत्या. मात्र वरदहस्त असल्याने हे अवैध धंदे कराणारे कोणालाही जुमानत नसल्याचे दिसून येत आहे.

सांस्कृतिक व अध्यात्मिक शहर म्हणून रोहे शहराची ओळख आहे. तालुक्याचे ठिकाण असल्याने शहरात मोठी वर्दळ असते. गेल्या वर्षानंतर शहरात पुन्हा एकदा अवैध धंद्यांना उत आला आहे. मटका जुगार, क्लब जुगार, चक्री हे अवैध व्यवसाय ठिकठिकाणी जोमात चालु आहेत. त्यांना कोणाचे वरदहस्त आहेत, याची चर्चा सुरू आहे.

पोलिसांनी ही गेल्या दोन वर्षांत अनेकदा या अवैध धंद्यांवर कारवाया केल्या आहेत, तरीसुद्धा रोहा शहरात मोठ्या प्रमाणात मटका जुगार, क्लब जुगार, चक्री चालू आहे. या अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

**शहरातील अवैध धंद्यांवर सातत्याने कारवाई केली जात आहे. शहरात अवैध धंदे आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल.**

**-संजय पाटील, निरीक्षक,**
**रोहा पोलीस ठाणे**


मा. गोडसे साहेब कोर्ट

प्रोसेस जमा ता. | ॲड. इर्शाद शेख पनवेल, अर्जदाराचे वकील

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात...**

दि.चौ.अर्ज. क्र. २०३/२०२२
नि-८/ड
ने.ता. ०६/०४/२०२२

१) श्रीमती. आशा विजय देशमुख
वय - ७० वर्षे, धंदा - गृहिणी
२) श्री. अजय विजय देशमुख
वय - ४७ वर्षे, धंदा - नोकरी
३) श्री. गौरव विजय देशमुख
वय - २९ वर्षे, धंदा - नोकरी
सर्व रा. तिसरा मजला, साई निवास,
प्लॉट नं १०, साई बाबा मंदिर जवळ,
सेक्टर ८ अ, सीबीडी, बेलापूर, ४००६१४
जि. ठाणे
क्र. १ स्वतः करीता व क्र. २ व ३चे अखत्यारी म्हणून } अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै. विजय शामराव देशमुख यांचे दि. ०१/११/२०२० रोजी निधन झाले आहे. कै. विजय शामराव देशमुख यांची आई कै. इंदुमती शामराव देशमुख उर्फ पवार यांचे देखील दि. २४/०६/२०१९ रोजी देहावसान झाले आहे. कै. विजय शामराव देशमुख यांस हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार हे एकमेव कायदेशिर वारस आहेत. श्रीमती. आशा विजय देशमुख वगैरे ह्यांनी कै. विजय शामराव देशमुख यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै. विजय शामराव देशमुख यांच्या नावे असलेल्या स्थांवर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| अ) | मौजे-खारघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील सेक्टर २० मधील भुखंड क्र. ५२ व ५३ वर बांधण्यात आलेल्या हावरे स्प्लेंडर को. ऑप. हौसिंग सोसायटी या इमारतीचे तळमजल्यावरील शॉप नं. ३२, क्षेत्र २९५.३० चौ.मी. अशा वर्णनाची मिळकत. |
| ब) | मौजे-सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई, जि. ठाणे येथील सेक्टर ८ ए मधील भुखंड क्र. १० वर बांधण्यात आलेल्या साई निवास को. ऑप. हौसिंग सोसायटी या इमारतीचे तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३/०. क्षेत्र ९६० चौ. फुट अशा वर्णनाची मिळकत |

वर श्रीमती. आशा विजय देशमुख वगैरे हे कै. विजय शामराव देशमुख यांचे कायदेशिर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे कोर्ट श्रीमती. आशा विजय देशमुख यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. विजय शामराव देशमुख यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २२/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **लिपिक** **दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल** | (कोर्टचा शिक्का) | **सही/-** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल**


## पेणमध्ये कथासंग्रहाचे प्रकाशन

**पेण : प्रतिनिधी**

ज्येष्ठ रंगकर्मी कै. पांडुरंग विठ्ठल घांग्रेकर यांच्या 'देवा घरचे जात कुणाला' या चौथ्या कथासंग्रहाचे प्रकाशन पेण दातार आळीतील घांग्रेकर वाडा येथे झाले. या कथा संग्रहाचे प्रकाशक दत्त अवधुत एंटरप्रायझेसचे कौस्तुभ विलास भिडे हे आहेत.

कै. पाडुरंग घाग्रेकर यांच्या उत्तरकार्यानिमित्त त्यांनी लिहलेल्या 'देवा घरचे जात कुणाला' या कथासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. राजू कामतेकर, स्मिता घायेकर, सुकृत घायेकर यांनी कै. पांडुरंग घांग्रेकर यांच्या आठवणींना उजाळा दिला.

कै. पांडुरंग घांग्रेकर यांच्या पत्नी अंजली घांग्रेकर मुलगा सुनील, सुन अश्विनी, विलास भिडे, प्रकाशक कौस्तुभ भिडे यांच्यासह नातवंडे, जावई, जळगाव येथील त्याचा शिष्य परिवार या वेळी उपस्थित होते.



(छाया : अनिस मनियार)

## ध्येय्याबरोबरच सुसंस्कृतपणा अंगिकारा -बाबुलाल पाखरे

### मुरूड नाईक महाविद्यालयात १८७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण

**मुरुड : प्रतिनिधी**

ध्येय्य निश्चिती करून तसेच सुसंस्कृतपणा, नम्रपणा अंगिकारून विद्यार्थ्यांनी भावी जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी बाबुलाल पाखरे यांनी मंगळवारी (दि. २२) येथे केले.



(छाया : संजय करडे)

कोकण उन्नती मित्र मंडळाच्या मुरूड येथील वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ मंगळवारी सकाळी झाला. त्यात प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी बाबुलाल पाखरे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. अंतिम ध्येय्य गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा व आई, वडिलांच्या इच्छा पूर्ण करा, असा सल्ला त्यांनी यावेळी दिला. या कार्यक्रमात १८७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

व्हॉट्सॲपपासून दूर राहून विद्यार्थ्यांनी संगणकावर सर्व ऑनलाइन सेवा शिकून आणि बौद्धिक गट स्थापन करून घरबसल्या अर्थार्जन सुरू ठेवावे, असे सनदी लेखापाल अशोक जोशी यांनी या वेळी सांगितले. महाविद्यालय विकास समिती सदस्या वासंती उमरोटकर यांनी ही या वेळी मनोगत व्यक्त केले.

महाविद्यालय विकास समिती सदस्य सुभाष महाडिक, प्राचार्य विश्वास चव्हाण, डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. मधुकर वेदपाठक, डॉ. जनार्दन कांबळे, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, डॉ. जनार्दन कांबळे, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. देवीदास रौदळ, नाना गुरव, गजानन मुनेश्वर, डॉ.सीमा नाहिद यांच्यासह विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जतमध्ये सेंद्रिय खतांवरील कलिंगड शेती

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील चांधई येथील प्रगतशील शेतकरी सुनील रसाळ यांनी आपल्या शेतात या वर्षी कलिंगडाची लागवड केली असून, त्यासाठी फक्त सेंद्रिय खताचा वापर केला आहे. येत्या महिनाभरात खवय्यांना सेंद्रिय खतांवरील कलिंगडे चाखता येणार आहेत.

सुनील रसाळ हे गेल्या काही वर्षांपासून वेगवेगळ्या वाणांच्या कलिंगड पिकाची शेती करीत आहेत. गतवर्षी रसाळ यांनी आपल्या शेतात शुगरकिंग या जातीची कलिंगडे पिकवलेली होती. ठिबक सिंचनच्या माध्यमातून पाणी आणि खाते यांचा पुरवठा करण्याची यंत्रणा सुनील रसाळ यांनी विकसित केली असून त्यामुळे पाण्याचा गैरवापर होत नाही आणि पिकाला खतेदेखील योग्य प्रमाणात मिळतात.

गेल्या हंगामात सुमारे तीन किलो वजनाची २५ टन कलिंगडे त्यांनी विकली होती. सुनील रसाळ यांनी पिकवलेली कलिंगडे चविष्ट व खायला गोड असल्याने त्यांच्या शेतात पिकलेल्या कलिंगडाला मोठी मागणी असते. कोणत्याही बाजारात न जाता आपल्या शेतात पिकलेली कलिंगडे शेताच्या बांधावर विकण्यात सुनील रसाळ यांचा हातखंडा आहे. यावर्षी सेंद्रिय खतांचा वापर करून सुनील रसाळ यांनी कलिंगड शेती केली आहे. महाशिवरात्री पूर्वी रसाळ यांच्या शेतात कलिंगडाचे फळ विक्रीसाठी सज्ज असणार आहे.

राजनाला कालव्यातून अद्याप शेतीसाठी पाणी सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे पाच एकर क्षेत्रात कलिंगडाचे पीक घेणाऱ्या सुनील रसाळ यांच्यावर यावर्षी केवळ दोन एकर जमिनीत कलिंगडाचे पीक घेण्याची वेळ आली आहे. राजनाला कालव्यात काही दिवसांत पाणी आले तर आणखी कलिंगड शेती करण्याचा आपला प्रयत्न आहे, असे शेतकरी सुनील रसाळ यांनी सांगितले.



(छाया : संतोष पेरणे)

## माणगाव तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

### २५ फेब्रुवारीला होणार वितरण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पत्रकार संघाचे २०२१ या वर्षातील पुरस्कार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांनी माणगाव येथे पत्रकार संघाच्या बैठकीत जाहीर केले.

माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे दरवर्षी विविध क्षेत्रातील व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. २०२१ या वर्षात उल्लेखनिय कामगिरी बजावणाऱ्या माणगावच्या तहसीलदार प्रियांका आयरे कांबळे (प्रशासकीय अधिकारी), शांताराम खाडे (अध्यात्मिक), चंद्रशेखर देशमुख (सहकार), महादेवराव बक्कम (समाजसेवा) ॲड. केदार गांधी (विधी), डॉ. प्रदीप इंगोले (वैद्यकीय), तळ्याचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे (लोकप्रतिनिधी), राजनभाई मेथा (उद्योजक), नेहा दाखिनकर (महिला सरपंच), मंगेश पोळेकर (तरुण उद्योजक), संजय गांधी (कोविड योद्धा), राजेंद्र तेटगुरे (ग्रामसेवक), शंकर शिंदे (शिक्षक), डॉ. आरिफ पागारकर (ज्येष्ठ पत्रकार), देवयानी मोरे (महिला पत्रकार), किशोर मालुसरे (तलाठी), लालासो वाघमोडे (वाहतूक पोलीस), रामदास जाधव (प्रगतशील शेतकरी) यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

माणगाव येथील कुणबी भवनात शुक्रवारी (दि. २५) सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.


**ग्रामपंचायत गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**
**जाहीर निविदा**

सर्व अधिकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गव्हाण १५वा वित्त आयोग फंडातून खालील कामांसाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत, तरी अधिकृत ठेकेदारांनी दि. २३/०२/२०२२ ते ०१/०३/२०२२ पर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास सकाळी ११:०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील. त्या वेळी उपस्थित रहावे. कोणतेही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोपर येथे अंतर्गत पाईप लाईन टाकणे. | ७७२७९५/- | ७७२७/- | ५००/- | ३ महिने | १५वा वित्त आयोग (सन २०२१/२२) |
| २ | मौजे बेलपाडा येथील श्री. शशीकांत एन.कडू ते श्री. पंकज पी. पाटील ते श्री. अजय धनाजी ठाकूर यांच्या घरापर्यंत पाईप गटार बांधकाम करणे. | २२४८३३/- | २२४८/- | ५००/- | ३ महिने | ग्रामपंचायत फंड |

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. सदर कामांचे अंदाजपत्रकिय रक्कम ३०००००/- वरील सर्व कामांना नोंदणीकृत (रजिस्टेशन) ठेकेदारांनीच कामाची निविदा भरावी.
३. इसारा रक्कम व निविदा फी रोखीत भरावी लागेल.
४. निविदा फी ना परतावा समजावी.
५. नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल. तसेच पॅनकार्डची झेरॉक्स सोबत जोडणे बंधनकारक राहील.
६. अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
७. निविदा मंजूर केल्यास रूपये १००च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा दयावा लागेल.
८. सूरक्षा अनामत रक्कम ५%, इंन्कमटॅक्स २.३०%, ग्रामपंचायत विकास निधी ५% वर्क इन्शुरन्स् १% अशा रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
९. सूरक्षा अनामत ९० दिवसांनी कामांचा दर्जा पाहून परत मिळेल.
१०. कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतील काम पूर्ण न झाल्यास व दूसऱ्या ठेकेदाकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
११. सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करणेचे आहे.
१२. वरील अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.
१३. काम चालू करताना फोटो, काम चालू असताना फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचा फोटो बंधनकारक राहील.
१४. सदर कामाचे बील रक्कम रूपये २,५०,०००/-च्या पुढील रक्कमेवर १% जी.एस.टी तसेच १% सी.एस.टी कर कापणे अनिवार्य आहे. ठेकेदाराकडे जी.एस.टी. व सी.एस.टी. नंबर असणे बंधन कारक राहिल.

**सही/-** **सरपंच** **ग्रामपंचायत गव्हाण** | **सही/-** **ग्रामविकास अधिकारी** **ग्रामपंचायत गव्हाण**

# यूपी, बंगळुरू सेमीफायनलमध्ये






**बंगळुरू : वृत्तसंस्था**

चढाईपटू प्रदीप नरवालच्या (१८ गुण) उत्कृष्ट खेळांच्या बळावर यूपी योद्धाने प्रो कबड्डी लीगमध्ये एलिमिनेटर-१च्या सामन्यात पुणेरी पलटणला ४२-३१ असे नमवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. या पराभवामुळे पुणेरी संघाचे आव्हान संपुष्टात आले.

पुणेरी संघाने अखेरच्या साखळी लढतीतील विजयासह बाद फेरी गाठली होती, मात्र एलिमिनेटर-१च्या सामन्यात त्यांना खेळ उंचावण्यात अपयश आले. यूपीच्या प्रदीपने चढाईत तब्बल १७ आणि एक बोनस अशा एकूण १८ गुणांची कमाई केली. त्याला सुरेंदर गिल आणि सुमित यांनी प्रत्येकी पाच गुण मिळवत उत्तम साथ दिली. पुणेरीच्या अस्लम इनामदारची (१० गुण) झुंज अपुरी पडली.

एलिमिनेटर-२च्या सामन्यात बंगळुरू बुल्सने गुजरात जायंट्सला ४९-२९ अशी धूळ चारत उपांत्य फेरी गाठली. बंगळुरूकडून चढाईपटू पवन कुमार शेरावतने (१३ गुण) अप्रतिम कामगिरी केली. गुजरातच्या राकेश सुंग्रोयाला (आठ गुण) इतरांची फारशी साथ लाभली नाही.

## आज दुहेरी थरार

*प्रो कबड्डी लीगमध्ये बुधवारी (दि. २३) उपांत्य फेरीचा थरार रंगणार आहे. पहिल्या सामन्यात पाटणा पायरेट्स वि. यूपी योद्धा (वेळ : सायं. ७.३० वा.) आणि दुसऱ्या सामन्यात दबंग दिल्ली वि. बंगळुरू बुल्स (वेळ : रात्री ८.३० वा.) आमनेसामने असतील.*

# पीएसएलमध्ये झळकले विराटचे पोस्टर

**कराची : वृत्तसंस्था**

सध्या पाकिस्तानमध्ये पाकिस्तान सुपर लीग सुरू आहे. या स्पर्धेत भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीचे पोस्टर झळकले असून यावर पाकचा माजी गोलंदाज शोएब अख्तरनेही प्रतिक्रिया दिली आहे.

पाकिस्तानमधील एका क्रिकेट चाहत्याने विराट कोहलीचे पोस्टर सामन्यादरम्यान झळकावल्यानंतर त्याचा फोटो व्हायरल झालाय. या पोस्टवर विराटने पीएसएलमध्ये खेळावे, अशी इच्छा व्यक्त करण्यात आली आहे.

पाकिस्तानचा माजी गोलंदाज शोएब अख्तरने हा व्हायरल फोटो शेअर केलाय. ट्विटरवरून अख्तरने पोस्ट केलेल्या फोटोमध्ये एक पाकिस्तानी क्रिकेट चाहता कोहलीचा फोटो असणारे पोस्टर घेऊन गद्दाफी स्टेडियममध्ये सामना पाहण्यासाठी आल्याचे दिसत आहे. हा फोटो शोएबने गद्दाफी स्टेडियममध्ये कोणीतरी प्रेम पसरवत असताना अशा कॅप्शनसहीत शेअर केला. या फोटोमधील चाहत्याने हातात पकडलेल्या पोस्टवर विराटचा फलंदाजी करताना फोटो आहे. या पोस्टवर मला पाकिस्तानमध्ये तू शतक झळकावलेले पहायचे आहे, असे वाक्य लिहिलेले असून खाली पीस म्हणजेच शांतता असा हॅशटॅग वापरण्यात आलाय.



## शोएब अख्तरनेही घेतली दखल

मुल्तानच्या संघाकडून खेळणारा शान मसूद आणि मोहम्मद रिझवान हे अर्धशतक झळकावून फलंदाजी करताना चौकार, षटकारांमधून धावांचा पाऊस पाडत असतानाच एका चाहत्याने हे पोस्टर झळकावले.

मागील बऱ्याच काळापासून विराट त्याच्या ७१व्या शतकाच्या प्रतीक्षेत आहे. त्याने २०१९मध्ये बंगलादेशविरुद्ध एकदिवसीय सामन्यामध्ये शतक झळकावले होते. त्यानंतर त्याने एकही आंतरराष्ट्रीय शतक केलेले नाही.

# साहाच्या आरोपांवर द्रविडने सोडले मौन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेसाठी अनुभवी यष्टिरक्षक फलंदाज वृद्धिमान साहाची भारतीय संघात निवड करण्यात आलेली नाही. यानंतर माध्यमांसमोर साहाने बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुली आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्यासोबत झालेले संभाषण समोर आणले. साहाने एका पत्रकाराने सोशल मीडियावर दिलेल्या धमकीचा स्क्रीनशॉट शेअर केल्याने वाद आणखी वाढला. यावर द्रविडने प्रतिक्रिया दिली आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेनंतर प्रशिक्षक राहुल द्रविड, राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष चेतन शर्मा यांनी अप्रत्यक्षपणे आपल्याला निवृत्ती पत्करण्याचे संकेत दिले, असा आरोप वृद्धिमान साहाने केला. साहाने रविवारी केलेल्या विधानामुळे खळबळ उडाली आहे.



या संपूर्ण प्रकरणावर वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेनंतर राहुल द्रविडने पत्रकार परिषदेत उत्तर दिले. साहासोबतचे संभाषण समोर आल्यानंतर तुम्ही दुःखी आहात का? या प्रश्नाला उत्तर देताना द्रविडने याबाबत भाष्य केले. मी अजिबात दुःखी नाही. साहाने भारतीय क्रिकेटसाठी जे काही केले त्याबद्दल मला खूप आदर आहे. मला त्याच्याबद्दल आदर होता म्हणून मी त्याच्याशी बोललो होतो. प्रामाणिकपणा आणि स्पष्ट भूमिका हा त्याचा हक्क आहे. त्याने माध्यमांकडून हे ऐकावे अशी माझी इच्छा नव्हती. मी नेहमीच खेळाडूंशी संवाद साधतो. मी जे काही बोलतो ते त्याला आवडेल आणि तो सहमत असेल असे नेहमीच होत नाही, असे द्रविडने म्हटले.

# आयपीएल लिलावात एखाद्या जनावरासारखे वाटते

## क्रिकेटपटू रॉबिन उथप्पाने मांडली भूमिका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जचा फलंदाज रॉबिन उथप्पाने एका मुलाखतीत आयपीएल लिलावाबाबत आपले मत व्यक्त केले. उथप्पा म्हणाला की, लिलावादरम्यान आम्ही काही वेळापूर्वी परीक्षा दिली आहे. आता त्याचा निकाल येणार आहे. त्या वेळी तुमच्यामध्ये बोली लावली जाणारे जनावर असल्यासारखी भावना तयार होते.

रॉबिन उथप्पाने पुढे म्हटले की, आयपीएलमधील लिलाव बघून असे वाटते की खेळाडू ही काही वस्तू आहे, ज्याची खरेदी-विक्री केली जात आहे. हे बघून बरे वाटत नाही. उथप्पाने नुकताच आयपीएल २०२२च्या लिलावाचा भाग घेतला होता. त्याला चेन्नई सुपर किंग्जने दोन कोटी रुपयांच्या मूळ किमतीत संघात सहभागी करून घेतले. चेन्नईकडून पुन्हा खेळण्याची संधी मिळणार असल्याबद्दल त्याने आनंद व्यक्त केला.



रॉबिन उथप्पाने कबूल केले की तो आणि त्याचे कुटुंब चेन्नईचा भाग होण्याची आशा करीत होता. उथप्पाने एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये याबाबत भाष्य केले आहे. सीएसकेसारख्या संघासाठी खेळण्याची माझी इच्छा होती. माझी एकच प्रार्थना होती की पुन्हा संघात दाखल व्हावे. माझ्या कुटुंबाने, माझ्या मुलानेही त्यासाठी प्रार्थना केली. ज्या ठिकाणी मला सुरक्षित आणि आदर वाटतो अशा ठिकाणी जाऊन मला आनंद होतो, असे उथप्पा म्हणाला.

जे खेळाडू विकले जात नाहीत त्यांचे काय होईल याची तुम्ही कल्पनाही करू शकत नाही. ती चांगली भावना नव्हती जे खेळाडू लिलावात बराच काळ थांबले, पण त्यांना संघ मिळाला नाही. त्यांच्याबद्दल माझे संवेदना आहेत. कधी कधी ते खूप निराशाजनक असते, असे पुढे बोलताना उथप्पाने म्हटले.

सर्वांच्या फायद्यासाठी एक प्रारूप प्रणाली असावी आणि ते खूप आदरणीय असेल, असे सांगून चेन्नईच्या संघासोबत आपली कारकीर्द संपवायची आहे. तसे झाले तर ते खूप चांगले होईल, असेही उथप्पाने नमूद केले.

# क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबई वॉरिअर्स संघ विजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ महाराष्ट्राने नुकताच आपला ८७वा व्यवसाय प्रारंभ दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. यानिमित्ताने बँकेच्या नवी मुंबई झोनने आपल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल येथे क्रिकेट स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत नवी मुंबई वॉरिअर्स संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत नवी मुंबई झोनच्या वतीने नवी मुंबई वॉरिअर्स, वाशी चार्जेर्स, रायगड सुपरकिंग्स, कोकण डेअरडेव्हिल्स अशा चार संघांचा सहभाग होता. स्पर्धेचे उद्घाटन बँकेचे कार्यकारी संचालक विजयकुमार यांच्या हस्ते झाले. साखळी सामने जिंकून नवी मुंबई वॉरिअर्स आणि वाशी चार्जेर्स या दोन संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा झाला. यात वाशी संघाने आठ शतकांत १०२ धावांचा डोंगर उभारून बलाढ्य असे लक्ष्य नवी मुंबई संघाला दिले. प्रत्युत्तरात नवी मुंबईचा कर्णधार अभिनव शर्मा यांनी तुफान फलंदाजी करून एकवेळ



अशक्य वाटणारे १०२ धावांचे लक्ष्य सात षटकांतच पूर्ण केले. अभिनव व सागर शिंदे यांनी मोठी भागीदारी करून अंतिम सामना सहज जिंकला. विजेत्या संघांसह सामनावीर उपझोनल मॅनेजर अमित सुतकर, स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू अभिनव शर्मा, उत्कृष्ट फलंदाज पूजन झा, उत्कृष्ट गोलंदाज दर्शन शिंदे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक प्रशांत मोरे यांना गौरविण्यात आले.

स्पर्धेस बँकेच्या महाप्रबंधक व झोनल मॅनेजर अपर्णा जोगळेकर यांनी उपस्थित राहून खेळाडूंचे प्रोत्साहन वाढविले. पारितोषिक वितरण त्यांच्याच हस्ते झाले. या वेळी उप अंचल प्रबंधक अमित सुतकर, सहाय्यक महाप्रबंधक पिंकी राणी, मुख्य प्रबंधक दिलीपकुमार उपाध्याय, मनीषा शर्मा, चंदन कुमार, रवी बालचंदानी उपस्थित होते.


सामन्याचे धावते समालोचन सुतकर, अरविंद मोरे, उपाध्याय, पुनीत कपाथिया, झा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी मोरे, सुशांत वर्मा, प्रसेनजीत अंकुश, ओंकार शिंदे, व गोपीचंद पाटेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार मोरे यांनी केले.

# हारिस रौफने भर मैदानात कामरानला मारली कानाखाली

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तान सुपर लीगच्या चालू हंगामात सोमवारी पेशावर झाल्मी आणि लाहोर कलंदर यांच्यातील सामना खूपच रोमांचक झाला. या सामन्यादरम्यान लाहोर कलंदरचा वेगवान गोलंदाज हारिस रौफने विकेट घेतल्यानंतर त्याचा सहकारी कामरान गुलामला खानाखाली मारली, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. यासाठी क्रिकेट चाहते हॅरिस रौफवर टीका करीत आहेत.

पेशावर झल्मीच्या डावाच्या दुसऱ्या षटकात ही घटना घडली. हारिस रौफ गोलंदाजी करीत होता. त्याच्या एका चेंडूवर कामरान गुलामने पेशावर झल्मीचा सलामीवीर हजरतुल्ला जझाईचा झेल सोडला. रौफ हे पाहून खूप संतापला. तेव्हा त्याने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही, मात्र त्याच षटकात रौफने मोहम्मद हारिसला बाद केले आणि सर्व खेळाडू आनंद साजरा करण्यासाठी त्याच्याकडे आले. तेव्हा रौफने कामरान गुलामला कानाखाली मारली. मोहम्मद हारिस सहा धावा करून रौफच्या चेंडूवर फवाद अहमदकडे झेल देऊन बाद झाला. कामरानने पेशावर झल्मीचा



सलामीवीर हजरतुल्ला झाझाईचा झेल सोडला होता, जो नंतर १६ चेंडूंत २० धावा करून मोहम्मद हाफिजचा बळी ठरला.

हारिसच्या या कृतीने सहकारी खेळाडूंना धक्काच बसला, पण कामरान गुलामने ते अगदी सहजतेने घेतले. कोणतीही प्रतिक्रिया न देता त्याने हसत हसत हारीसला ढकलले. यानंतर बाकीचे खेळाडूही हसायला लागले. हारिसच्या चेहऱ्यावरही हलके हसू आले.

या सामन्यात पेशावर झल्मीने २० षटकांत ७ बाद १५८ धावा केल्या. प्रत्युत्तरात लाहोर कलंदरनेही २० षटकांत आठ गडी गमावून तेवढ्याच धावा केल्या. त्यानंतर पेशावर झल्मीने सुपर ओव्हरमध्ये सामना जिंकला.





**उलवे नोड : पनवेल तालुका भारतीय जनता पक्ष आणि उलवे नोड २ महिला मोर्चा कमिटीतर्फे आयोजित हळदीकुंकू समारंभ सोमवारी उत्साहात झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, शकुंतला ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससमोर झालेल्या या हळदीकुंकू समारंभात महिलांसाठी विविध खेळ घेण्यात आले. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com